# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ०१/०७/२००४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक ०१/०७/२००४ रोजी सभा सुचना क्र. ०७ दि. २५/०६/२००४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | सदस्य |
| ४) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ५) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ६) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ७) | श्री. नितीन गोपीनाथ ठाकूर | सदस्य |
| ८) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ९) | श्री. दिनेश द. नलावडे | सदस्य |
| १०) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ११) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| १२) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| १३) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | सदस्य |
| १४) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| १५) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४३ चे वाचन केले.)

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, सभा सुरू होण्यापूर्वी गेल्या स्थायी समितीमध्ये आपण सांगितले होते की, तो भराव उचलू. पण अजूनही तो उचलला नाही.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़े.) :-**

दोन दिवसामध्ये तो भराव काढून टाकण्यात येईल. आताच आमची याबाबत चर्चा झाली आणि दोन दिवसात कार्यवाही करण्याचे बांधकाम विभागाकडून काम करण्यांत येईल.

**दिनेश नलावडे :-**

सभापती महोदय, कामकाज चालू करण्यापूर्वी मी एक अभिनंदनाचा ठराव या ठिकाणी मांडू इच्छितो, मी काल परवा पेपरमध्ये वाचले. आमचे सहकारी मित्र आणि सहकारी पक्षाचे सदस्य सन्मा. आसिफ शेख यांची महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सदस्य पदी निवड झाली. त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मी या ठिकाणी मांडतो.

**चंद्रकांत वैती :-**

मी अनुमोदन देत आहे.

**अभिनंदन ठराव क्र. ५१ :-**

महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस कमिटीच्या सदस्य पदी श्री. आसिफ शेख, नगरसेवक मिरा भाईंदर महानगरपालिका यांची निवड झालेबाबत ही सभा अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश नलावडे.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत वैती.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. सचिव :-**

इतिवृत्तांताला सुरूवात करू या.

**मिलन म्हात्रे :-**

पान नं. ६ मध्ये जो सभापतींचा आदेश दिलेला आहे तो त्या त्या डिपार्टमेंन्टला सक्रीय केलेला आहे का? मैदानाच्या भाड्याबाबत.

**मोहन पाटील :-**

पान नं. ८ मध्ये मा. सभापतींनी आयुक्त साहेबांना सेवा नियम करुन घेण्याबद्दल सांगितले होते. मा. सभापतींना मी विचारतो आपण सेवा नियमाबद्दल काय लेखी दिले आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सेवा नियम तयार झाले असून मा. महासभेसमोर लवकरच ठेवण्यात येतील.

**शरद पाटील :-**

पान नं. ३५ मध्ये जे पहिले नगरसेवक निधीमधून त्याच्यामध्ये जे कामाचे विवरण केलेले आहे. ते जरा चुकीचे आहे. त्यामध्ये बदल व्हायला पाहिजे. मानसरोवर ते स्वामी समर्थ इमारतीपर्यंत काम त्यांनी केलेले नाही. मानसरोवर ते स्वामी समर्थपर्यंत सन्मा. सदस्या भवरीकुंवर नरावत यांच्या नगरसेवक निधीमधून झालेले आहे. त्याच्यामुळे ते चुकीचे झालेले आहे. इथे ते बदली करून घ्यावे.

**दिपक खांबित :-**

मानसरोवर ते स्वामी समर्थ पुढे कापून टाका.

**प्रकरण क्र. ४३ :-**

दि. १०/०६/२००४ रोजीचे मा. स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ५२ :-**

दि. १०/०६/२००४ रोजीच्या मा. स्थायी समितीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश नलावडे.** **अनुमोदन :- श्री. हॅरल बोर्जीस.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४४ चे वाचन केले.)

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, आता आपण किती औषधे आणली. त्याचा तपशील द्या.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

आतापर्यंत कंपनीकडून थेट वीस हजार लीटर्स औषधे खरेदी करण्यात आली होती. मलेरिया ऑईल आणि पुन्हा या वर्षाकरिता एम.एल.ओ. ऑईल आपल्याला खरेदी करावयाचे आहे.

**शरद पाटील :-**

आपण यापूर्वी कुठचे खरेदी करित होतो? एम.एल.ओ. ऑईल खरेदी करित होते. पण साहेब, जेव्हा वीस हजार लीटर्स आल्यानंतर दिड महिन्याने विचारले की सांगायचे की, आमच्याकडे स्टॉक नाही. तर स्टॉक एवढया लवकर संपवायचा .

**राजकुमार कांबळे :-**

जानेवारी पर्यंत मागवला आहे.

**धनराज अग्रवाल :-**

आता स्टॉक केव्हा आपण आणणार आहात?

**राजकुमार कांबळे :-**

जानेवारीला मागवला होता.

**धनराज अग्रवाल :-**

जानेवारीला मागवला तर आता कुठला महिना झाला. जून महिना झाला. तर आजपर्यंत का अवलोकनार्थ आणला नाही. हे बघा, मी तुमच्यावर क्लेम करतो की, तुम्ही पाच लाखाचे काम जरा से कमी करून चार लाख नव्याण्णव हजार करून आयुक्तांच्या अंडरमध्ये आणलेले आहे. हे बरोबर नाही. जर स्थायी समितीवाल्यांनी सगळयांनी मिळून याच्यावर ऑब्जेक्शन घेतले तर फार मोठी चूक आहे. जानेवारीमध्ये काम झालेले आहे. तर जूनमध्ये तुम्ही काम कसे आणता? ॲजेस्टमेंट करून पाच लाखाचे जास्त जाउ नये म्हणून चार लाख नव्याण्णव हजारपर्यंत आणले. हे बरोबर आहे का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

इंडियन ऑईल कॉर्पोरेशन या थेट कंपनीमार्फत आपण हे औषध घेतलेले आहे. कोणत्याही वितरकाकडून घेतलेले नाही.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, मी काय प्रश्न विचारलेला आहे. जानेवारीमध्ये ह्या लोकांनी आणलेले आहे. मग इकडे स्थायी समिती नव्हती का? अवलोकनार्थ आणायचाच होता मग पहिला का आणला नाही. ह्यांना पहिले मला उत्तर देउ दे. नाहीतर पेन्डींग राहते.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल तुमच्या प्रश्नाचा पुरक प्रश्न विचारतो. आपण जे एम.एल.ओ. ऑईलनाशक आपण जे खरेदी करतो हे वर्षातून किती वेळा खरेदी केले? म्हणजे चार वर्षाचे फक्त एकच आहे.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल यांचा असा प्रश्न आहे की, जानेवारीमध्ये तुम्ही खरेदी केलेले आहे. तर तेव्हापासून तुम्ही आता मंजुरीसाठी का आलात?

**मिलन म्हात्रे :-**

याच ह्याच्यामध्ये मी अडीच महिन्यापूर्वी स्वतः पत्र दिलेले आहे की, गोडाउनची स्टॉक रजिस्टर जी काही असतील त्याचे डिटेल द्या. अजूनपर्यंत लेखी उत्तर आलेले नाही. नुसते एम.एल.ओ. ऑईलच असे नाही, तर कुठलेच नाही.

**राजकुमार कांबळे :-**

बाकीच्या निविदा मागवलेल्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला उत्तर कधी द्याल? आम्ही तुम्हाला फक्त पत्रच देत राहायची का?

**धनराज अग्रवाल :-**

आम्ही देखील पत्र दिले. त्याचे उत्तर देत नाही. एक दिड महिना झाला.

**मिलन म्हात्रे :-**

केळकर साहेब, आपली गोडाउन खाली आहेत. तुम्ही कोणाची बाजू घेउ नका आणि कोणाला सांभाळू नका. उद्या रोगराई पसरली तर लोक तुम्हाला, आम्हाला, सगळयांना रस्त्यावर पकडून काढतील.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, सन्मा. सदस्यांनी पत्रव्यवहार केला त्याला उत्तर मिळायला पाहिजे. उत्तर द्यायला अडचण काय असते? ते मला कळत नाही. नगरसेवकांना पहिले उत्तर देत चला. ॲज इट इज व्हेअर इट इज जे असेल ते देवून टाकायचे.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही कुठलाही आरोप केलेला नाही. आम्ही स्पष्ट विचारलेले आहे, आपल्या गोडाउनमध्ये आम्ही स्थायी समितीमध्ये एवढी तरतुद केलेली आहे. आम्ही तरतुद करून देणे महत्त्वाचे आहे. ती केली. त्याच्यानंतर औषधेच आलेली नाहीत. नुसत्या अभियानाच्या आपण गोष्टी करतो. परंतु स्प्रे पंपाचा ठिकाणा नाही. जे मागे प्लॉस्टिकचे पंप आणले ते सगळे फेल्युअर आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

सहा महिने हे प्रकरण आले नाही. त्याच्यामध्ये काय हेतू आहे?

**मा. सभापती :-**

डॉक्टर साहेब नसल्या कारणाने आपण हा विषय पुढे घेऊ या.

**धनराज अग्रवाल :-**

हे बघा, अवलोकनार्थ आलेला आहे. स्थायी समिती पूर्ण एक होउन त्याचा विरोध केला पाहिजे.

**मा. सभापती :-**

यांच्याकडे उत्तर नाही. मग डॉक्टर साहेब आल्यावर बघू.

**चंद्रकांत वैती :-**

पण नेमकी परिस्थिती काय आहे? असे का झाले? आपण बिल एवढे लेट मंजुरीसाठी का आणले?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़े.) :-**

याचे अधिक समर्पक उत्तर डॉक्टर देवू शकतील.

**मिलन म्हात्रे :-**

मला एक सांगा हा अवलोकन होउन आला आहे.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, हा अवलोकनाचा विषय आहे. पूर्ण करून तुम्हाला घ्यावा लागेल. आमच्या ज्या सूचना आहेत त्या सूचनेला तुम्ही बरोबर उत्तर देण्यासाठी लेखी पत्र देवून तुम्ही त्यांना उत्तर द्यायला पाहिजे आणि जानेवारीचा विषय तुम्ही आता आणता. हा पण महत्त्वाचा विषय आहे, हा विषय अवलोकनाचा आहे. तो तुम्हांला करावा लागेल. तुम्ही उत्तर द्या.

**धनराज अग्रवाल :-**

हे बघा माझा आक्षेप आहे.

**मा. सभापती :-**

उत्तर द्यायला डॉ. बावस्कर हजर नाही आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब, मी इकडे आक्षेप करतो, जाणूनबुजून अवलोकनार्थ आणलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

केळकर साहेब, या सगळयाला तुम्ही जबाबदार आहोत. याच्यावर तुमची सही आहे. याला तुम्हीच उत्तर देणार. बाकी कोण देणार नाही. डॉक्टर लोकांवर इथे कशाला मारता? तुम्ही विषय आणलेला आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़े.) :-**

गोषवारा हा प्रशासकीय असतो.

**मिलन म्हात्रे :-**

असू दे. उद्या चुकीचा गोषवारा तुमच्या सहीने पाठवून आमच्याकडे निर्णय मागाल.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़े.) :-**

गोषवाऱ्यावर सही आयुक्त आणि उपआयुक्तांचीच राहणार. त्यामुळे माझ्यामार्फत हा गोषवारा आलेला आहे. त्याच्यामध्ये कारण आहे, ते उशीरा का आले?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही काय क्लिअरींग करता? हे क्लिअरींग झाली. एकदा मंजुर करा म्हणजे दुकाने चालू.

**चंद्रकांत वैती :-**

शहराच्या आरोग्याच्या विषयी नेहमी सर्व सदस्य पोटतिडिकीने बोलत असतात. तर माझे असे मत आहे की, तुम्ही एकदा एक विशेष आरोग्यावर लावा. कारण आपल्याकडे नेहमी तक्रार असते की,

औषध फवारणी होत नाही किंवा आपली औषधे स्टॉकमध्ये नाहीत आणि आजची बाब तर नक्कीच गंभीर आहे की, आपण सहा महिन्यानंतर त्याचे बिल अवलोकनार्थ आपल्या स्थायी समितीच्यासमोर येते की चुकीची गोष्ट आहे. याच्यावर एक विशेष सभाच लावली पाहिजे.

**शरद पाटील :-**

आरोग्याच्या बाबतीतच असे होते की, आपल्याला सरळ सरळ उत्तरे मिळतात की, आपले जे कर्मचारी आहेत. त्यांना औषध मारण्याचे माहित नाही आणि त्यांना माहिती नसेल तर माहिती करून द्या.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, आपल्याकडे अवलोकनार्थ विषय येतो की नाही?

**मा. सभापती :-**

उद्याच्या उद्या मी तुम्हाला द्यायला लावतो.

**मिलन म्हात्रे :-**

एवढा वेळ कालावधी का गेला?

**धनराज अग्रवाल :-**

सभापती साहेब, जानेवारीच्या नंतर स्थायी समितीमध्ये सगळ्या लोकांनी विषय मांडलेला. मच्छर जास्त जास्त वाढत गेले होते. औषधे आली की नाही ह्यामध्ये सुद्धा मला शंका आहे.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, अवलोकनार्थ विषय आपल्याकडे येतो. तो संबंधित खात्यामार्फत म्हणजे खालच्या एस.आय. पासून, विभागप्रमुख, विशेष कार्यकारी अधिकारी, इंटरनल ऑडिटर नंतर फिरून फिरून उपआयुक्त नंतर आयुक्त सगळयांच्या सह्या होउन या ठिकाणी हा विषय आलेला आहे. तर ऑडिटर साहेबांनी यामध्ये माहिती द्या. ज्या सदस्यांना शंका वगैरे आहेत. त्या शंकांचे निरसन करून टाका. समाधान झाले म्हणजे काम संपले. समाधान व्हायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

मार्चमध्ये आचार संहिता आहे. हा विषय जानेवारीचा आहे. जानेवारी, फेब्रुवारी, मार्च अडीच महिने झाले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख, सही करून दिलेले अधिकारी हजर आहेत. त्यांना लेट झाल्याबद्दल क्लिअरन्स करू दे डॉक्टर साहेबांची गरज का लागली?

**सुधिर नाकाडी :-**

हा प्रस्ताव आमच्याकडे जानेवारीतच पास झालेला आहे. प्रस्ताव मंजुरीसाठी आमच्याकडे येतो. जानेवारीत आला. जानेवारीमध्ये प्रस्ताव मंजुर झाला त्याच्यानंतर त्या विभागाची तिकडे ठेवायची जबाबदारी आहे. त्याच्यानंतर आचारसंहिता लागली.

**मोहन पाटील :-**

जानेवारी, फेब्रुवारी, मार्च,एप्रिल, मे, जून आचार संहिता किती, सहा महिने असते.

**सुधिर नाकाडी :-**

ते त्या विभागाचे कर्तव्य होते. तो जो गोषवारा द्यायचा आहे.

**मोहन पाटील :-**

साहेब, आर्थिक तुम्हाला सांगतो. इथे काय चाललेले आहे. मी तुम्हाला उद्देशून बोलतो असा विषय नाही आहे. सभापती महोदय, संपूर्ण स्थायी समितीच्या अखत्यारिमध्ये लेखापाल हे असतात. आपला आर्थिक बोजा संपूर्ण त्यांच्या हातात असतो. संपूर्ण स्थायी समितीच्या अंडरमध्ये हे असतात आणि जर उद्या काय तक्रार झाली तर आपण यांच्याबरोबर फासावर जायचे का? असा विषय होत नाही. कोणता विषय करू नये या विषयावर आम्ही दुमत नाही. आम्हाला विषय झाले पाहिजेत. तुम्ही सहा महिने बोलता. पण आपण काय केले?

**सुधिर नाकाडी :-**

जानेवारीमध्ये हा विषय मंजुरीसाठी.

**मोहन पाटील :-**

जानेवारी, फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे, जुन आचार संहितेचा किती वेळ लागते? मग आपला कोणता कंट्रोल आहे.

**सुधिर नाकाडी :-**

१६ तारखेला सुद्धा माझा रिमार्क बघा. १६ जानेवारीला मी अवलोकनार्थ ठेवा म्हणून सांगितले आहे.

**मोहन पाटील :-**

मग आपण पुढे काय केले?

**सुधिर नाकाडी :-**

त्याच्यानंतर ते विभाग जबाबदार आहे.

**मोहन पाटील :-**

त्याच्यानंतर स्थायी समितीच्या ब-याचशा सभा झाल्या. आपले संपूर्ण काम चालते स्थायी समितीच्या अधिपत्याखाली चालते. संपूर्ण स्थायी समितीच्या अखत्यारित आपला आर्थिक व्यवहार जे लेखापाल, इंटर ऑडिटर वगैरे आहेत. हे आपल्या ह्याच्यामध्ये स्थायी समितीत चालते. तर आपण वेळोवेळी गाईडलाईन स्थायी समितीच्या सभापतींना दिली पाहिजे. आता उपआयुक्त साहेब, बोलले की, मी त्याच्यावर सही करतो. पण ह्यांनी दिले, त्यांनी दिले. आम्हाला सही करायला पाहिजे हा विषय नाही. परंतु आपली जबाबदारी आहे ही आर्थिक बाब आहे. सचिव साहेब जर अवलोकनार्थ विषय घेतल्यानंतर तो विषय किती दिवसामध्ये मंजुर होतो जर स्थायी समितीने हा विषय नामंजुर केला तर तो किती दिवसांनी मंजुर होतो. जर आम्ही अवलोकनाचा विषय या ठिकाणी केला नाही तर तो विषय किती महिन्यांनी मंजुर समजला जातो.

**दिपक खांबित :-**

पंधरा दिवसांनी मंजुर होतो.

**मोहन पाटील :-**

बरोबर आहे. तो विषय मंजुर होतो आणि हे एम.एल.ओ. ऑईल जानेवारी महिन्यामध्ये आपण आणलेले आहे. मग आम्ही काय समजायचे? हा विषय तुम्ही आता ठेवला याचे कारण काय आहे?

**प्र. सचिव :-**

माझ्याकडे प्रशासनाकडून ज्या दिवशी गोषवारा आला त्याच्या दुस-या दिवशी हा विषय ठेवलेला आहे.

**मोहन पाटील :-**

मग आम्ही जबाबदार आहोत का?

**प्र. सचिव :-**

ते प्रशासन ठरवेल.

**मोहन पाटील :-**

प्रशासन ठरवेल बरोबर आहे. जानेवारीचे बिल जर इथपर्यंत आलेले आहे. अवलोकनाचा विषय तुम्ही आता आणता. अवलोकनाचा जर विषय मंजुर नाही केला तर पंधरा दिवसांनी तो विषय मंजुर होतो, असे बोलले जाते. बरोबर आहे. हा अवलोकनाचा विषय आणल्यानंतर याचे पेमेन्ट तुम्ही कधी केले? पेमेन्ट केले मग जबाबदार कोण झाला? मग प्रशासनाने याचा खुलासा करा. काम करा किंवा नाही करा. मग स्थायी समिती आपणच चालवा. आमची या ठिकाणी काय आवश्यकता आहे? आमची या ठिकाणी आवश्यकताच नाही. हा विषय होउ नये या मताचा मी नाही आहे. पण जर आताच पंधरा दिवसांनी मंजुर होईल. जानेवारीच्या आधी आपण तो दिलेला आहे. नाकाडी साहेब, आपण कृपया याचा खुलासा करावा. जानेवारीला आपण जे बिल दिलेले आहे. मग ह्याला जबाबदार कोण आहे? जर विषय न आणता आपण बिल दिलेले आहे. आपल्याला आपला विषय अवलोकनार्थ ठेवला पाहिजे. आपण विषय ठेवू दिला नाही पाहिजे. विषय सहा महिने ठेवला तरी चालतो. तीन महिने ठेवला तरी चालतो. हा वादाचा मुद्दा नाही. पण जर जानेवारीत बिल देवून हा विषय आचारसंहिता सांगून त्या विषयाला प्रॉब्लेम केला तर त्याला पुरेसे कारणदेखील दिले पाहिजे आणि ज्या आर्थिक बाबी या ठिकाणी होतात ती गाईडलाईन आपण मा. सभापतींना दिली पाहिजे. सभापतींना म्हणजे ती स्थायी समितीला झाली. आपण जर गाईडलाईन देत नसाल तर आपण कामामध्ये कामचुकारपणा करता का? असे प्रश्नचिन्ह या ठिकाणी निर्माण होउ शकेल आणि आर्थिकबाब असेल तर साहेब त्या ठिकाणी कामचुकारपणा चालू शकत नाही.

**सुधीर नाकाडी :-**

कामचुकारपणा नाही आहे. प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर त्या संबंधित विभागाकडून प्रस्ताव येतो. मुख्य लेखा परिक्षक तो प्रस्ताव तपासून मा. आयुक्तांची सही होते. मा. आयुक्तांची सही झाल्यानंतर

त्या विभागाची जबाबदारी असते की, आम्ही जे आदेश दिले ते आदेश दिल्यानंतर आयुक्तांनी मंजुरी असते. ती मंजुरी दिल्यानंतर त्या विभागाची जबाबदारी असते की, हा विषय लगेच फक्त गोषवारा बनवून तो स्थायी समितीपुढे ठेवायचा असतो. लेखा परिक्षकाची जबाबदारी नसते.

**मोहन पाटील :-**

मग आपण स्थायी समितीला अशी माहिती दिली असेल तर मी मा. सभापतींना सभेपुढे सर्व सदस्यांच्या वतीने सांगू इच्छितो की, आपण कोणती कार्यवाही या प्रशासनाला करू शकाल. जर प्रशासनाने या ठिकाणी कामचुकारपणा केला असेल किंवा हलगर्जीपणा करित असेल तर आपण कोणती कार्यवाही करू शकाल. तुम्ही त्यांना कोणता आदेश देणार की, असे काम केले, नाही केले, योग्य केले नाही असे कोणत्या पद्धतीने तुम्ही प्रशासनाला सांगू शकाल. याचा खुलसा करावा.

**मा. सभापती :-**

सर्व सदस्यांनी मला सांगावे काय करायचे?

**चंद्रकांत वैती :-**

आतापर्यंत जे विषय आले. स्थायी समितीच्या सर्व सदस्यांपुढे गेल्या दोन वर्षात जे विषय आतापर्यंत आले. याच्यामध्ये बरेचसे विषय हे बांधकाम खाते आणि आरोग्य खाते यांच्याशी निगडित असलेले हे विषय अवलोकनार्थ आलेले आहेत. स्थायी समिती इथे आहे. स्थायी समितीसमोर सरळपणे इतर डिपार्टमेंटचे विषय येतात. ते ज्या पद्धतीने मंजुर होतात त्या पद्धतीने ते विषय मंजुर झाले पाहिजेत. आपत्कालीन समयी आयुक्त अवलोकनार्थ पाठवू शकतात. पण वारंवार आयुक्त साहेबांकडून आपल्याला या दोन डिपार्टमेंटचे विशेषतः पाणीपुरवठा खाते आणि आरोग्य खाते यांचे अवलोकनार्थच विषय आलेले असतात. त्याचे काही विशेष प्रयोजन आहे का? मी तर म्हणतो, या स्थायी समितीसमोर आतापर्यंत गेल्या दोन वर्षात जे जे पाणी खात्याचे अणि आरोग्याचे विषय अवलोकनार्थ आलेले आहेत. याची किती अमाउंट आतापर्यंत केली आणि मग ते कशाला आणायचे? आणि याच्यापुढे जर असे विषय येणार असतील तर स्थायी समितीने सरळ आम्हाला काय, आम्ही काय मंजुर केलेले आहे तुमच्या अखत्यारित करा हे तुम्ही स्थायी समितीपुढे कशाला आणता? वारंवार सदस्यांमध्ये वाद आणि आरोप कशाला पाहिजे?

**धनराज अग्रवाल :-**

तुमच्या अखत्यारित करा. असा प्रस्ताव करा. तुम्ही तुमच्या अखत्यारित पास करा.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, आता जी माहिती या ठिकाणी सन्मा. सचिव साहेबांनी दिलेली आहे की, एखादा विषय समजा स्थायी समितीपुढे आयुक्तांनी मंजुर केला तर अवलोकनार्थ किती दिवसांनी आला पाहिजे? पंधरा दिवसात आला पाहिजे.

**दिपक खांबित :-**

पण १५ दिवसांत हे काम पूर्ण झाले पाहिजे. ॲग्रीमेंन्ट भरायला यायला पाहिजे. विधी सल्लागारांचे अभिप्राय मागवलेत. साहेबांनीच मागविलेत.

**धनराज अग्रवाल :-**

याच्यात पूर्ण काम काय? किंवा पुर्ण औषध वापरणार नंतर येणार असे आहे का?

**आसिफ शेख :-**

आयुक्त साहेबांना नियमाप्रमाणे दहा लाखाच्या आत पावर्स मंजुर करायच्या आहेत की नाहीत? तर त्यांच्या अखत्यारित मंजूर करून घ्या.

**चंद्रकांत वैती :-**

सभापती साहेब, आपल्याकडे विधी सल्लागार आहेत. आजची बाब त्यांच्या सल्ल्याने आपण पुढे विचारली पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, आपण विधी सल्लागारांची नियुक्ती केल्यापासून ते किती मिटींगला हजर आहेत तर एकाही नाही. त्यावेळेलाच त्या प्रस्तावाला मी विरोध केला होता. त्यांची नियुक्ती झाल्यानंतर त्याचा चेहरा काळा की, गोरा आम्ही कधी सभागृहात बघितले नाही की, इकडे बघितले नाही.

**चंद्रकांत वैती :-**

त्यांची मुदत किती आहे? ते बघा आणि तसा ठराव करा.

**मिलन म्हात्रे :-**

मी त्यावेळेला त्या नियुक्तीला विरोध केला होता. आता हा विषय आरोग्याचा आहे. जानेवारी महिन्यामध्ये वीस हजार लीटर आपण खरेदी केले. त्याचा ठराव आलेला आहे. त्याच्यानंतर आपण संपूर्ण शहराकरिता आपण एम.एल.ओ. खरेदी केलेले नाही असे आपण समजु या आणि वीस हजार लीटर आरोग्य खाते किती वेळ वापरते आणि कुठे-कुठे वापरते आणि किती महिन्यात औषध संपले. म्हणजे जानेवारी नंतर आपण औषध घेतलेलेच नाही हे सिद्ध झाले आहे.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, आज हा मुद्दा आपल्यासमोर उपस्थित राहिलेला आहे आणि सर्व लोकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे आणि विधी सल्लागार उपलब्ध असतील तर आता बोलवा आणि या विषयावर त्यांचा अभिप्राय विचारा.

**मिलन म्हात्रे :-**

माझा तर ह्या विषयावर ठराव आहे.

**धनराज अग्रवाल :-**

स्थायी समितीचा विरोध लिहून तुम्ही आयुक्त साहेबांकडे पाठवा.

**चंद्रकांत वैती :-**

आपण विधी सल्लागारांना बोलवा आपण माहिती घेउ.

**मिलन म्हात्रे :-**

आणि तुम्ही त्यांना विचारा. तुम्ही आमचे विधी सल्लागार आहात तर आपण सभेला उपस्थित का राहत नाही?

**दिपक खांबित :-**

सभापती साहेबांकडून आपण त्यांनी लिखित कळू या आणि ज्याचा विषय असेल त्यांनी सभेला उपस्थित राहायचे असे आपणच ठरविले होते.

**मिलन म्हात्रे :-**

विधी सल्लागार सर्व ठिकाणी ॲप्लीकेबल आहे. आरोग्य विभाग, बांधकाम विभाग कुठेही. सभाशास्त्रानुसार कुठे अडचण होईल तिथे त्यांची गरज लागेल.

**आसिफ शेख :-**

जिथे जिथे सल्ला लागेल. मग ते कोणत्याही विभागात लागू दे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, जसे ऑडीटर सर्व विभागात असतात तसे विधी सल्लागारांचे आहे.

**दिपक खांबित :-**

साहेब, याबाबत प्रशासन दखल घेईल.

**मिलन म्हात्रे :-**

प्रशासन दखल घेईल पण येथे केळकर साहेबांनी सही केली आहे आणि सहा महिन्या अगोदरचा प्रस्ताव आता आला आहे.

**मोहन पाटील :-**

प्रशासनाने दखल घेतलीच पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आपण ५६ चा ठराव पास करा.

**दिपक खांबीत :-**

साहेब, याबाबत प्रशासन दखल घेईल.

**धनराज अग्रवाल :-**

प्रशासनाने आजपर्यंत काय दखल घेतली, आजपर्यंत कुठलीही दखल घेतलेली नाही.

**दिनेश नलावडे :-**

मा. सभापती साहेब, आज आपल्याकडे जो स्थायी समितीकडे विषय आलेला आहे प्रकरण क्र. ४४ हा अतिशय गंभीर विषय आहे. अशाप्रकारचे माझ्या मते आतापर्यंत दोन वर्षात स्थायी समितीमध्ये सहा महिन्यानंतर केव्हाही अवलोकनार्थ विषय आला नाही आणि ही पहिलीच वेळ अशी आहे की, सहा महिन्यानंतर हा विषय आपल्याकडे येतोय ह्याचे कारण जो पर्यंत आपल्याला मिळत नाही तोपर्यंत हा विषय बाजूला ठेवा. हा विषय नामंजूर करून आपण बाजूला ठेवू.

**मोहन पाटील :-**

आपण हा विषय नामंजूर करू शकत नाही.

**दिनेश नलावडे :-**

जर आपल्याला बरोबर उत्तर मिळत नसेल आणि येथे कोणी संबंधित अधिकारी उपस्थित नाही.

**मोहन पाटील :-**

अवलोकनार्थ आहे म्हणजे तो विषय मंजूर होतोच.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यावर केळकर साहेबांची सही आहे त्यांना तुम्ही जबाबदार धरा.

**धनराज अग्रवाल :-**

आपण आयुक्त साहेबांना याबाबत पत्र द्या.

**मोहन पाटील :-**

आपण ह्याच्यावर चौकशी करा व पुढच्या सभेला आपण विधी सल्लागारांना बोलवा.

**धनराज अग्रवाल :-**

आपण सर्व सन्मा. सदस्यांनी एकमताने प्रस्ताव आणा आणि ते आयुक्त साहेबांना द्या.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य वैतीली ह्यांनी ह्याच्यावर सूचना अशी मांडलेली आहे की, यापूर्वी असे जे अवलोकनाचे विषय येतात त्यासाठी विधी सल्लागार आहेत आणि आरोग्याचे असे बरेच तक्रारी आहेत. त्याबाबीकरिता विशेष सभा बोलवावी आणि संबंधित विषयावर चर्चा करावी.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, आता हे जे काम झाले आहे त्याला असेच सोडून द्यायचे. याबाबत ठराव काय?

**जोजफ घोन्सालवीस :-**

हा असा प्रकार झाला आहे असे आपण आयुक्त साहेबांना पत्र पाठवा म्हणजे पुढे असे होणार नाही.

**धनराज अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील ह्यांचे काय म्हणणे आहे, हा ठराव बरोबर आहे, ह्याला पास करा असे आहे का?

**मोहन पाटील :-**

साहेब, अवलोकनार्थ विषय आहे.

**धनराज अग्रवाल :-**

आपण स्थायी समिती मिळून आयुक्त साहेबांना पत्र द्या की, हा विषय अवलोकनार्थ बरोबर आलेला नाही. आपण ह्याची फेरतपासणी करा.

**मिलन म्हात्रे :-**

दरवेळेला आपण अवलोकन बोलतोय आणि मागच्या सभेत हाच वाद झाला, असे नाही आहे की, आयुक्त साहेबांनी जे पाठविले ते आपण डोळे झाकून पास करून मोकळे करून टाकायचे. अवलोकनाचा अर्थ असा आहे की, आयुक्त साहेबांच्या नंतर आपण काय निर्णय घेतला ती रिसपॉन्सीबिलीटी आपली आहे. उद्या अन्य ठिकाणचे काय काय प्रकार चालले आहेत ते बघा. आजच्या पेपरमध्य त्या कोनार्कचे आलेले आहे. स्थायी समितीचे, मा. महासभेचे सगळे निकाल आणि मुख्यमंत्र्यांचा निकाल कोर्टाने फिरवलेला आहे. आम्ही हे म्हणत नाही की, ह्याला मंजूरी देवू नका. मी तर ह्याच्यापुढे जावून सांगतो वीस हजार लिटरच्या व्यतिरिक्त औषधच मागवले नाही, मग आपली स्थायी समितीने तरतुद केली ती गेली कुठे? मी ह्याच्यापुढे जावून सांगतो, साहेब तुमच्या वार्डमध्ये औषध कमी पडले, माझ्या वार्डमध्ये औषध कमी पडले. सगळयांच्या वार्डमध्ये औषध कमी आहेत. ह्याचे आम्ही पत्र दिले आहे. तुमच्याकरिता स्टॉक रजिस्टरनुसार मला स्टॉक कळवा. आपल्या येथे औषध मारायला पंप नाही आहेत. ही वाईट परिस्थिती आहे.

**शरद पाटील :-**

औषध मारायला पंप नाही. आपण जी एवढी खरेदी करून फॉगींग मशीन आणली आहे ती कुठे कुठल्या कचऱ्याच्या डब्यात टाकली आहे, ती आता दिसत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तो टेंम्पो सुद्धा बंद आहे.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती साहेब, फॉगींग मशीन भाड्याने आणली होती का? येथे भाड्याने आणायचे काम चालू आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, रस्ते साफ करण्याकरिता लागणारे ब्रश, हातझाडू, घमेली हे जे साहित्य आहे त्याचा ठिकाणा गोडाऊनमध्ये नाही आहे. कशाकरिता आपण ग्रामस्वच्छता अभियान, संत गाडगेबाबा महाराज अभियान करायचे? काय गरज आहे?

**आसिफ शेख :-**

आपल्याला पुरस्कार मिळाला.

**मिलन म्हात्रे :-**

कोणाला काही पडलेले नाही आणि ते सगळे हसू आहे, पुरस्कार मिळाला आणि आम्ही गोडाउन दाखविली तर लफड होईल. काल उपमहापौर आले होते त्यावेळेला. ट्रिपींग चालले होते. येथे जायचे नाही नाही तिथे जायचे असे. त्याच्याकरिता हया सगळयांचा विचार करा आणि त्याच्यावर निर्णय घ्या. वैती साहेब तुम्ही जे बोललात अवलोकनार्थ जर ते करतील तर आपले काय काम आहे. विधी सल्लागाराला बोलावायला कोण गेले आहेत? आपण रजेवर गेलेलो बरे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे प्रकरण ७ कलम ७३ (ड) नुसार कोणतीही संविधा मान्य झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत ते स्थायी समितीसमोर अवलोकनार्थ सादर करणे ही संबंधित विभागाची जबाबदारी होती. परंतू संबंधित विभागाकडून या प्रकरणी थोडी दिरंगाई झाली. त्याबद्दल मी प्रशासनाच्यावतीने दिलगिरी व्यक्त करतो आणि यापुढे प्रत्येक विषय पंधरा दिवसाच्या आत येईल अशात-हेचा मा. आयुक्त साहेब ह्यांच्या सहीने ताबडतोड एक परिपत्रक सर्व विभागांना देतो. यापुढे प्रत्येक विषय पंधरा दिवसाच्या आत स्थायी समितीसमोर येईल याची दखल शासनाकडून घेण्यात येईल.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आपण चुकी तर कबूल केली आहे. पण क्षमापन कुठल्या कायद्याखाली करता? ह्याच्यावर आपण कार्यवाही काय केली ते आपण आम्हाला सांगा. जे झाले ते सगळ मान्य आहे, पण ही जी चुक झाली त्याच्याकरिता इन्क्रीमेंट वगैरे काय थांबवता का? ते सांगा. त्याशिवाय काहीही होणार नाही. कारण तुमच्या आदेशाचे पालन अजून होत नाही. मागच्या सभेला जे ठराव आपले पास झाले, सभापती साहेबांचे निर्णय आहेत, प्रत्येक दोन चार सभेच्या अगोदर आम्ही बोलत असतो, पण ते निर्णय खालच्या कर्मचाऱ्यांपर्यंत जातच नाही. शिवमुर्ती नाईक साहेब मागे आपण ५५ अ, ब बद्दल प्रकरण केले होते. ५६ चे ठराव ते दोन महिन्यापर्यंत खाली गेलेच नव्हते.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, आपण ह्याच्यावर निर्णय द्यायचे काय करणार? प्रत्येक कामाला दिलगिरी होते.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यामध्ये दिलगिरीचा प्रश्न नाही. ह्याच्यामध्ये निर्णय काय ते बोला.

**धनराज अग्रवाल :-**

आम्ही ह्या खात्याला चार चार वेळा पत्र दिले आहे व माहिती विचारली आहे पण ह्यांच्याकडून माहिती का देत नाही.

**मा. सभापती :-**

मी सर्व सदस्यांसमोर सांगतो तुम्ही निर्णय घ्या. मी त्याला मंजूरी देणार.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, पिठासीन अधिकारी आपण आहात.

**मा. सभापती :-**

मी, सर्व सदस्यांना घेउन चालतो ह्याचा अर्थ तुम्ही जे सांगाल ते मी करायला तयार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

उपायुक्त साहेब, ही अक्षम्य चुक कबूल केली की, चुकी झाली ह्याच्यावर आपली शिक्षा काय ते सांगा. आम्ही चुकलो तर आम्हाला कोण माफ करेल का? आणि हे प्रत्येक वेळेला सारखे सारखे होत राहते. म्हणजे परत परत चुका करायच्या व त्याला मधली वाट काढायची. एखाद्या वेळेला सचिवांनी सांगायचे की, ते ग्रॅमाटिकल आहे, आकार उकार बरोबर नाहीत. ठिक आहे, पण ह्या काही अक्षम्य

चुका आहेत व त्याला आमची परवानगी मिळाली आणि त्याच्यामध्ये पहिला सभापती हे जिम्मेदार असतात.

**मा. सभापती :-**

मला असे वाटते की, डॉक्टर साहेबांची मुदत संपलेली आहे व जर ह्याच्यापुढे मुदत वाढीचे आले तर आपण मुदतवाढ देउ नका. आपल्याला माहिती आहे की, आरोग्याचे काम सुरळीत चालत नसेल तर आपण मुदतवाढ देउ नका.

**मिलन म्हात्रे :-**

तो एक विषय सेपरेट झाला. एस.आय.जे. परमनन्ट आहेत ते काय करत होते. ह्याच्यावर डॉक्टरांच्या सह्या नसतात. आपला जो परमनन्ट स्टाफ आहे, लोकल स्थानिक वगैरे आपण बोलतो ते काय करत होते. त्यांना उद्या आपण वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्त करण्याचा प्रयत्न कराल त्यांची काय जिम्मेदारी नाही का? साहेब, ह्यांच्या एका चुकीमुळे आपल्याला फासावर लटकायला होईल त्याचे काय? आपला विचार करा, आपण.

**चंद्रकांत वैती :-**

अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी अशा गोष्टी झाल्यानंतर उद्या कुठल्या तरी एखाद्या कायदेशीर बाबीला तोंड द्यावे लागेल किंवा त्याच्यामुळे सदस्य अडचणीत येतील हे होण्यापेक्षा आपण कुठे चुकतो किंवा काहीतरी आपल्याकडून कमी पडते तर ती गोष्ट झाली नाही पाहिजे. ह्याची काळजी घेतली पाहिजे. आरोग्यबद्दल बोलायचे, जर डॉक्टर साहेब गेले तर संबंधित अधिकारी व कर्मचारी अडचणीत येतील. मग अशी गोष्ट व्हावी का? त्याच्यापूर्वी काही झालेले आहेत तशा इतर महापालिकेत झाल्या आहेत तसे आपल्याकडे व्हाव्यात असे वाटते का? ह्या गोष्टीला कुठेतरी पुर्णविराम मिळाला पाहिजे. स्थायी समितीसमोरच हे विषय आले पाहिजेत. वारंवार अवलोकनार्थ यायचे आणि आज तर वास्तविक संबंधित अधिकारीने थांबायला पाहिजे होते. बी.पी.एम.सी. ॲक्टमध्ये तरतुद आहे की, निविदा मंजूर झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत स्थायी समितीसमोर आले पाहिजे आणि ही निविदा २४ मिटींगनंतर आलेली आहे.

**धनराज अग्रवाल :-**

एम.एल.ओ. आले होते का? ह्यात देखील शंका येते.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, माझ्या वार्डमध्ये जेवढे औषध येते. ते किती घेतले. त्याच्या वर एस.आय.ची सही मी घेतो. ते औषध कुठे कुठे फवारण्यात आले त्या ठेकेदाराची सही घेतो आणि जो मुकादम असतो त्याची सही असते व मी नगरसेवक म्हणून सही करतो. हे सगळे जे आहे ते आम्ही आयुक्त साहेबांना दाखवले. तुम्हाला हसू होईल पण प्रश्न हा नाही आहे, भिंवडीला आरोग्याचा औषधाचा प्रश्न संपूर्ण महाराष्ट्रभर गाजला हे विसरू नका. माझे म्हणणे असे आहे की, ह्यांनी जो आता प्रश्न विचारला की, ते एम.एल.ओ ऑईल आले का? त्याच्यामध्ये माझ्याकडे मी सिद्ध करून दाखवतो की, जानेवारीपर्यंत किंवा जानेवारीच्या पुढच्या पंधरा दिवसात माझ्याकडे किती एम.एल.ओ ऑईल आले. त्याचा माझ्याकडे रेकॉर्ड आहे. असे रेकॉर्ड ह्यांच्याकडे आहेत का? आम्ही ते रजिस्टर आयुक्त साहेबांना दाखवले. हा जो अवलोकनाचा विषय ज्या आयुक्त साहेबांनी पाठविला त्यांनी त्याचवेळेला आदेश दिले की, मिलन म्हात्रेच्या वार्डमध्ये जी सिस्टीम सुरू आहे ती सुरू करा. प्रत्येक वार्डमध्ये रजिस्टर ठेवा. केळकर साहेब आपण त्या सभेला उपस्थित होता, त्याचे साक्षीदार आपण आहात. तुम्ही ह्या इथल्या मुख्यालयाचे उपायुक्त आहात. तुमच्या समोर ते आदेश दिले गेले होते, आयुक्त साहेबांनी पण अजून पर्यंत ते इम्प्लीमेंट झालेले नाहीत. मजूर कुठे गैरहजर आहेत, औषध आली की नाहीत, अवजारे मिळाली की नाहीत, ह्याचा कुठेही थांगपत्ता लागत नाही. त्यावेळेला आयुक्तांनी दिलेले आदेश आरोग्य खात्यातर्फे पाळले गेलेले नाहीत. आता तुम्ही जे नविन टेंडर ठेकेदाराला द्याल तर ठेकेदार वीस माणसांना नेमतो व त्याच्यातील पंधरा पाठवतो व पाच गैरहजर असतात. त्यांचे पगार काढले जात आहेत. ह्याचा कोणी हिशोब केला आहे का? ती लाखामध्ये रक्कम होते. आपण हे हसण्यावारी नेउ नका. सगळे जोक करत नाही. चांगल्यात चांगले जोक आम्हाला करता येतात. आपण येथे चर्चेला बसतो, निर्णयाला बसतो. ह्याचा कुठेतरी, कोणीतरी गांभीर्याने विचार करून निर्णय घेईल का? आपण दिलेल्या निर्णयाला किती महिने झाले आणि ते सगळे करणारा जो एस.आय. माझ्या विभागात होता श्री. सोनावणे त्याची बदली केली गेली, का तर त्याने रजिस्टर आणून दाखविले, हे तुम्ही एकप्रकारे त्याची इन्क्रीमेंट केली. त्याने चांगले काम केले. पण माझ्या वार्डमधून त्याला विनाकारण माझी तक्रार नसताना काढून त्याला मिरा रोडला पाठवून दिले, तर का? तिकडचा एक

चुकीचा एस.आय.ला शिकवायला तुमच्याकडे पाठवता. का? मी काय ट्रेनिंग खोलले आहे का? सगळयांना शिकवायचा मी ठेका घेतलेला आहे? एक एस.आय. ट्रेनिंग करायला मला चार चार महिने लागतात, मोठा वार्ड आहे. त्याला शिक्षा ती मिळाली म्हणून मी सांगतोय सगळया ठिकाणचे रजिस्टर मेनटेन करा. पण तुमच्याकडे तसे काही आहे का? मिरा रोडला २० हजार लिटरमधून किती एम.एल.ओ. पाठवला त्यानी ५ हजार लिटर एम.एल.ओ. पाठविला का? कुठेही, काहीही थांगपत्ता लागत नाही. २० हजार लिटर त्यांनी जे एम.एल.ओ मागवले ते तुम्हाला किती महिने पुरते, त्याच्यानंतर आतापर्यंत औषध आलेलेच नाही. हे मी परत एकदा सांगतोय. अजूनही गोडाउन खाली आहेत. परवा डॉक्टरांना नेउन आपल्या येथील संपूर्ण सर्वाजनिक ठिकाणे दाखविली. भिंतीवर माशांचे थर आहेत, अगदी खचून माश्या बसलेल्या आहेत. आता ते माशांचे औषध आले. साहेब, मागच्या वेळेला आपल्याकडे पंप आणले तर आम्ही लगेच मंजूरी दिली आणि ते पंप थर्ड ग्रेट क्वालिटीचे पंप आहेत, काही पंप कामाचा नाही आणि त्याचे नोजल खराब आहेत, औषध फवारले जात नाही. आज आपले ते पंपाचे पैसे फुकट गेले. त्याचा कोण साधक बाधक विचार करेल का? आपल्याकडे झाडू, हातझाडू, फुलझाडू नाही. शाळांमध्ये फिनेल नाही, ॲसिड नाही. आपण बाहेरची परिस्थिती बघू या, ह्या सभागृहातून बाहेर निघून. तुमच्याकडून शाळेचा स्वीपर काय मागतोय. आज आमच्याकडे सोळा, सतरा, अठरा शाळेमध्ये साडे तीन चार हजार विद्यार्थी येथे येतात. त्यांचे सर्व भवितव्य त्यांचे आरोग्य तिथे निर्भर असते. फिनेल, ॲसिड नाही आहे. आपले एस.आय. काय करतात? आम्ही फिरतो, पण एस.आय. कधी फिरत नाहीत. हयांना ऑफिसच्या बाहेर डयुटी लावा. वॉर्ड अधिकाऱ्यांचेसुध्दा आमच्याकडे लक्ष नसते. वॉर्ड अधिकाऱ्यांचे नेमणूक झाल्याचे पत्र अजूनपर्यंत आम्हाला आलेले नाही. मला माझ्या वॉर्डाचा अधिकारी कोण ते माहिती नाही. त्यांचे कार्यालय कुठे आहे ते माहिती नाही. फोन नंबर काय ते माहिती नाही. सभापती साहेब, तुमचा आणि आमचा वॉर्ड एकच आहे. तुम्हाला असे पत्र आले नसेल की, तुमचा हा वॉर्ड अधिकारी आहे. त्याचा पत्ता अमुक अमुक आहे आणि बसण्याचा पत्ता आणि कार्यालय येथे आहे. आज जवळजवळ माझ्या माहितीनुसार दिड महिना झाला त्याची नियुक्ती होउन पण मुख्यालय म्हणून आपण आम्हाला कधीच कळविले नाही. आपल्याला त्याची आवश्यकता वाटली नाही. संबंधित नगरसेवकांना कळवावे. हे असे जर परत परत होत राहणार तर तुम्हाला आम्ही क्षमा पण करत राहणार. हा कारभार असाच चालणार. आपल्या हया मुख्य इमारतीमध्ये ग्राउंडपासून चौथ्या माळयापर्यंत पाच लिटर फिनेल नाही. तुम्हाला तुमच्याकडचा स्टॉक माहिती आहे का? येथे पाच लिटर फिनेल नाही आहे. हयाचे उत्तर कोणाकडे आहे का? पंधरा दिवस झाले येथे पाच लिटरवर काम चालू आहे आणि साहेब आपण हयांना वेळीच पैसे दिलेले आहेत. आपण दरवेळेला तरतुदी करतो. हयांना आपण काय कमी पडू देत नाही. मजूर मंजूर करुन देतो, वाहन मंजूर करुन देतो, फिरण्याकरिता वाहने देतो, सगळी औषधे आणून देतो. हयाच्यावर आपण निर्णय दया. क्षमापन चालणार नाही. नाहीतर आम्ही मिटींगला बायकॉट करुन चाललो. आम्हाला ही सभा तहकुब करायची आहे. तुमचे काय मत आहे. ते आपण बोला. नाहीतर आम्ही वॉकआउट करतो. आज आरोग्याच्या हिशेबाने जर लहान मुलांचे तुम्ही दवाखाने बघितले तर तिथे चाईल्ड स्पेशालिस्टकडे गर्दी पडली आहे. हगवणीपासून सगळे रोग शहरामध्ये चालू आहेत. कोणी त्याचा रेशिओ घेतला आहे का? आपली लहान मुले किती आजारी आहेत, डॉक्टरांच्या येथे गर्दी किती आहे? पेशन्टस किती आहे? हा पूर्वीचा जून, जुलै महिना हयात सगळया साथीचा महिना असतो. कोणाला काय वाटलेले नाही आहे आणि कोणाला काय पडलेले नाही. आपण जी तरतुद करतो ती जाते कुठे? औषधे आले, येणार जाणार. मला कळते. आमच्याकडे पंप येणार महिनाभर ऐकतोय. सारखे सारखे क्षमापन चालणार नाही. तुम्हाला आम्हाला कोण क्षमा करणार नाही.

**धनराज अग्रवालः-**

आपण स्थायी समितीचा असा एक प्रस्ताव आयुक्त साहेबांना पाठवा की, हे बरोबर नाही आणि त्याच्यावर तुम्ही कार्यवाही करा.

**मिलन म्हात्रे :-**

ते स्पष्ट सांगतात की, नियमामध्ये पंधरा दिवसाची तरतुद आहे. त्यांनी नियमाचे उल्लंघन केले आहे. त्याच्यावर तुम्ही हया सभागृहाला आदेश दयायचा आहे. संबंधित जो कोणी अधिकारी आहे. त्याने हया नियमाचे उल्लंघन केले आहे. त्याच्याकरिता आम्ही त्याला अमुक अमुक ही शिक्षा फर्मावतो. त्या ऑडीटरने सरळ हात वर केले. माझी सोळा तारखेला सही आहे. माझे सर्व संपले व हयाच्यातला काही भाग नाही. ऑडीटरने आपले अंग काढून घेतले.

**मा. सभापती :-**

यासंबंधी आपण चौकशी करुन विलंबनाबाबत कार्यवाही केली जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

कारवाई म्हणजे शिक्षा काय करणार?

**धनराज अग्रवाल :-**

स्थायी समिती सभापती म्हणून आपण आयुक्तांना एक पत्र लिहा. पंधरा दिवसात हा विषय स्थायी समितीसमोर आला पाहिजे. पण तो आला नाही.

**मा. सभापती :-**

आपल्या पुढच्या सभेत ठेवतो. काय कार्यवाही झाली आणि काय नाही ते मी आपल्याला लेखी सांगणार.

**मिलन म्हात्रे :-**

आणि सहा महिने औषध परत का आले नाही. आपण जानेवारी महिन्यापर्यंत मंजुरी देतोय. म्हणजे आता जुलैपर्यंत एम. एल. ओ. आलेलेच नाही. माझ्या माहितीनुसार वीस हजार लिटर पंधरा दिवसात संपते.

**मा. सभापती :-**

आलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मी काय बोलतो? जानेवारीला वस्तु आली. ती आपण वापरुन टाकली. ती गोडाउनमधली संपली. म्हणजे जानेवारी पंधरा किंवा जानेवारी ३१ पर्यंत म्हणजे ती वस्तु संपल्यानंतर आपल्याकडे दुसरा स्टॉक नाही आहे. हयाचा अर्थ हा आहे आणि जर आता जुलैपर्यंत जर हयांना मंजुऱ्या पाहिजे असतात. तर अप टु जुलैपर्यंत हया लोकांना आपल्याकडे अवलोकनार्थ प्रस्ताव पाठविला असता की, जुलैपर्यंत आम्ही एक लाख लिटर एम.एल.ओ. संपूर्ण शहराकरिता विकत घेतले. हा टेक्निकल मुद्दा आहे. एकतर औषध नाही किंवा घेतले नाही किंवा घेतलेले औषध एवढया महिन्यात संपले. आपल्या गोडाउनला पाच महिन्यापर्यंत औषध नाही. अडीच महिने झाले. आम्ही पत्र दिलेले आहे. पण पत्राचे अजून उत्तर दिलेले नाही.

**कल्याण केळकर (उपआयुक्त) :-**

इंडियन ऑईल कंपनीमार्फत २८/०१/२००४ तारखेला आपणाकडे वीस हजार लिटर एम.एल.ओ. ऑईल आलेले आहे आणि इंडियन ऑईल ही कंपनी केंद्रशासनाच्या अखत्यारितील कंपनी असल्यामुळे त्यांच्याकडे पैसे ॲडव्हान्समध्ये जमा केल्याशिवाय कोणत्याही तऱ्हेचा ऑईल दिला जात नाही आणि यामध्ये डिमांड ड्राफ्ट वगैरे आपण त्यांना २३/०१/०४ तारखेला दिलेले आहे आणि कंपनीकडून चलनसुध्दा आलेले आहे. कंपनीचा ट्रक आला आहे. इंडियन ऑईल कार्पोरेशनतर्फे तो आपल्याकडे २८/१/०४ ला आलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

केळकर साहेब, हया विषयामध्ये कुठल्याही सदस्यांनी तुम्हाला विरोध केलेला नाही की, हे औषध तुम्ही का घेतले?

**कल्याण केळकर (उपआयुक्त) :-**

फक्त विलंब झाला.

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न तो नाही आहे. औषध घेणे कंपनीला का दिले किंवा प्रायव्हेट का नाही दिले? हा विषय येथे नाही आहे. त्यामुळे त्याचा खुलासा आपण मेहेरबानी करुन करुच नका. जो प्रस्ताव उशिरा पाठवला त्याच्याबद्दल बोला.

**चंद्रकांत वैती :-**

प्रस्ताव उशिरा का आला कारण लेखा परिक्षकाकडे स्थायी समितीमार्फत विषय गेला पाहिजे म्हणून तो उशिरा आला असेल. पण पेमेन्ट झालेले आहे. सगळे झालेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पेमेन्ट झाले. सगळे झालेले आहे. लेखा परिक्षकाचा संबंध नाही.

**चंद्रकांत वैती :-**

आता स्थायी समितीकडून लेखापालाकडे विषय जाईल ना.

**मिलन म्हात्रे :-**

१६ तारखेची त्यांची सही आहे.

**अशोक पाटील :-**

लेखापालाकडे गेल्याशिवाय त्याचा पेमेन्ट कसा झाला?

**चंद्रकांत वैती :-**

फक्त प्रोव्हिजन पूर्ण करण्याकरिता स्थायी समितीसमोर आलेले आहे. बाकीतर सगळे झालेले आहे. मग जर प्रशासनाने एवढे काम केले तर थोडे देर सवेर प्रशासनानेच मंजुर करुन घ्यावे, स्थायी समितीसमोर कशाला आणायचे?

**आसिफ शेख :-**

सुसंवाद व्यवस्थित साधला गेला नाही. जर सुसंवाद व्यवस्थित साधला असता तर कामच संपल असते. आपण सुसंवाद का साधत नाही?

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य वैतीजी हयांनी हया ठिकाणी असा प्रस्ताव ठेवलेला आहे की, सर्व चर्चा अंती प्रशासनाने आपली जबाबदारी झटकलेली आहे. आदरणीय उपआयुक्त हयांनी प्रशासनाच्यावतीने दिलगिरी व्यक्त केलेली आहे. तर मी वैतीजी हयांनी मांडलेल्या मतास माझे मत व्यक्त करतो की, मी त्यांच्या मताशी सहमत आहे. आपल्याला हा विषय आम्ही नामंजुर विषय मांडत नाही. हा विषय प्रशासनाने आपल्या अखत्यारिमध्ये मंजुर केलेला आहे. तर कृपया आमचीही दिलगिरी व्यक्त करतो. कृपया आपणही आपला विषय आपल्या अखत्यारिमध्ये मंजूर करुन घ्यावा. सभापती महोदय, हा विषय प्रशासन मंजूर करुन घ्यावा. तसा त्यांनी तो विषय मंजुर केलेला आहे.

**मा. सभापती :-**

प्रशासन कसे मंजूर करणार? मंजुरीसाठी स्थायी समितीसमोर आलेले आहे.

**मोहन पाटील :-**

मग त्यांनी विषय मंजूर करुन पैसे दिले, सर्व दिले, लेट फी केले. पुन्हा उपआयुक्त साहेबांनी दिलगिरी व्यक्त केली. सर्व झाले, मग प्रश्न येतो कुठे? ते त्यांनी मंजूर करु दे.

**अशोक पाटील :-**

हे आपल्याकडे कशाला मंजूरीकरिता आलेले आहे.

**मा. सभापती :-**

आपल्याला अधिका-यांवर कार्यवाही करायची आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कार्यवाही का करु नये. तुमच्याकडे विषयपत्रिकेवर आले. हयाच्यावर तुम्हाला विषय पत्रिकेवर कुठला तरी निर्णय घ्यावाच लागणार आहे. हा बॉल तुमच्या कोर्टामध्ये आहे. प्रशासनाने करावे हयाचा अर्थ काय? केळकर साहेब आपण गोड बोलून सगळी जिम्मेदारी आमच्यावर ढकललेली आहे. हा तुमचा शॉटकट आहे. तुम्ही त्याच्यातून बाजूला झाले. ऑडीटर साईडला झाले आणि हे आता आमच्याकडे पाठवले. तुम्ही तुमचे बोललात की, ही माझी रिस्पॉन्सीबिलीटी आहे. मी हे वाचून माझी चुक झाले असे आपण कुठेच बोलला नाहीत. तुम्ही सही केली. उदया एखादे चुकीचे पत्र पाठवले आणि खाली सही केली तर रिस्पॉन्सिबल मी राहणार आहे. कारण मी सगळे वाचून मग त्याच्याखाली सही केली आहे.

**कल्याण केळकर (उपआयुक्त) :-**

पण हा आमच्याकडून आलेला गोषवारा आहे.

**अशोक पाटील :-**

हा प्रस्ताव कालबाहय झालेला आहे. मग आपली मंजूरी कशाला घेतात? प्रशासनाने करुन घ्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, हयाच्यामध्ये दोन गोष्टी आहेत व मघाशी जे वैतीसाहेब बोलले सगळे जर विषय आयुक्त साहेबांकडून असेच येत असतील तर आपली काहीच गरज नाही. कशासाठी पाहिजे? आपण असे करा की, स्थायी समितीची महिन्याला, सहा महिन्याला एखादी सभा लावा. फॉरमॅलिटी पूर्ण करण्याकरिता पण त्याच्यात नोंद करुन घ्या की, हा विषय उशिरा झालेला आहे. जे सेक्शननुसार पंधरा दिवसात मांडायचे आहे. ती मुदत ओलांडून गेली तरीसुध्दा हे अवलोकनाला पाठविले. तसा रेकॉर्ड आला पाहिजे. आम्ही हयाच्यामध्ये रिस्पॉन्सीबल नाही.

**मा. सभापती :-**

सभापती साहेबांनी दिलगिरी व्यक्त केली आहे.

**प्रकरण क्र. ४४ :-**

एम.एल.ओ. अळी नाशक खरेदी प्रस्ताव अवलोकनार्थ सादर.

**ठराव क्र. ५३ :-**

सदरचा विषय मा. स्थायी समितीने मंजुर न करता पुन्हा मा. आयुक्तांकडे पाठविण्यांत आला.

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र ४५ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

आतापर्यंत किती खरेदी केले आहे?

**चंद्रकांत वैती :-**

वास्तविक आजच्या हया विषयासाठी संबंधित खात्याच्या अधिका-याने अतिरिक्त माहिती द्यायला पाहिजे होती. मागे ग्रीन कोर्टमध्ये आपले जे प्रशिक्षण शिबिर झाले त्याच्यामध्ये या विषयात बायोकल्चर खरेदी करणेकामी निविदा मंजूर करणे. तर याच्यासाठी आपआपल्या सोसायटीमध्ये जी जागा आहे. तिथे ओला कचरा, सुका कचरा असे वेगवेगळे बायफर चेंज करुन मग ओला कचरा जो होतो त्याचे तिथेच खत निर्माण करायचे असे चालले होते आणि आता हयाच्यामध्ये आपण असा विषय घेतोय की, सध्या नवघर स्मशान भूमी नजीकच्या मोकळया जागेत कचरा टाकणेत येतो. तर केंद्र शासनाने आणि सर्वोच्च न्यायालयाने आपल्याकडे आदेश दिले होते. डंपिंग ग्राउन्डबाबत तर डंपिंग ग्राउन्डसाठी आपण ती जागा ताब्यात घ्यायची. तेथून आपल्याला ते ठाण्याला न्यायचे असे अनेक आपले विषय चर्चेमध्ये आले. परंतु आजपर्यंत आपण कुठल्याही एका विषयावरती ठामपणे पोहचलेलो नाही. मग ह्याच्यावरती आपले आरोग्याचे अधिकारी जबाबदार आहेत की, उद्या ही सर्व जबाबदारी तुमच्या आमच्यावर येणार आहे. ही स्थायी समितीवर आणि सर्व नगरसेवकांवर, महासभेवर सर्व जबाबदारी येणार आहे. कारण हयाच्यामध्ये अजूनपर्यंत आपण कुठल्या विशिष्ट अशा निर्णयापर्यंत पोहचलो नाही तर बायोकल्चर खरेदी करणे कामाची निविदा मंजुरी. ही टिपणी सर्व सन्मा. सदस्यांनी वाचली आहे. याबाबत डॉ. बावस्कर हे विशेष कार्यकारी अधिकारी येथे उपस्थित नाही. तर त्यांच्या अनुपस्थितीमध्ये त्यांच्या डिपार्टमेन्टच्या या इतर अधिका-यांनी याबाबत योग्य ते मार्गदर्शन सदस्यांना करावे किंवा उपायुक्त साहेबांनी त्याच्यावर योग्य ती माहिती द्यावी.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

नगरपालिकेचा एकूण २६० टन कचरा आपला दैनंदिन निर्माण होतो आणि बायोकल्चर खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव सभेवर आहे. यासंबंधी आपण निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये एकूण तीन निविदा आलेल्या आहेत. त्या तीन निविदांमध्ये ग्रीन गोल्ड एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड यांची कमी दराची निविदा साठ रुपये प्रति किलो याप्रमाणे आहे. कमल एन्टरप्रायजेस हयांची पंच्याहत्तर प्रति किलोची आहे आणि विश्व मार्केटिंग ह्यांची १०५ प्रति किलोची आहे. त्यामध्ये कमी दराची निविदा असल्यामुळे त्याला स्थायी समितीच्या मंजुरीची आवश्यकता मा. आयुक्त साहेब हयांच्याकडून प्रस्तावित झालेली आहे आणि संबंधित विभागाने हयाच्यावर निविदा अगोदरच मागविलेल्या आहेत. निविदा १७/१२/०३ डिसेंबरला प्राप्त झाल्या आणि त्या आपल्या मंजुरीसाठी आपल्यासमोर आल्या आहेत.

**चंद्रकांत वैती :-**

साहेब, आपण घनकचरा व्यवस्थापनासाठी एक वेगळी तरतुद केलेली आहे. तर त्याच्यातून हा विषय कशाकरिता आला आहे. आपण बायोकल्चर का मागवायचे तर जो ओला कचरा, सुका कचरा वेगळा करुन त्या सोसायटयांमध्ये आपण खत निर्मिती करणार आहोत. त्याच्यासाठी आपण हे बायोकल्चर मागवून त्याच्यात मिश्रित करायचे आहे. त्याच्यासाठी आपल्याकडे किती प्रस्ताव आले किंवा आपण हे रस्त्यावर कुठेतरी डंपिंग ग्राउन्ड म्हणून नवघरचे स्पॉट आहे तिथे आपण कचरा फेकतो किंवा अन्य ठिकाणी टाकत असू तर त्या कच-यावर आपण ही फवारणी करणार आहोत. त्याच्यासाठी आपण हे मागवणार आहोत. आपण कार्यशाळा घेतल्या त्याचा अर्थ काय? आपण कार्यशाळेचा उल्लेख करतो की, दि. ९/६/०४ रोजी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० या विषयावर आयोजित

करण्यात आलेल्या कार्यशाळा ॲडव्हान्स लोकॅलिटी मॅनेजमेन्ट अंर्तगत हाउसिंग सोसायटी, निवासी घरे, संस्था, व्यापारी संकुले, सार्वजनिक बाजार हया ठिकाणी निर्माण होणारा ओला कचरा त्याच प्रभागात वापरुन त्यावर जैविक पध्दतीने प्रक्रिया करून खत निर्मिती करणेबाबतची चर्चा झालेली आहे. हे दोन्ही विषय वेगळे आहेत. मग तुम्ही नवघरच्या डंपिंग ग्राउन्डवरती बायोकल्चर मारणार का?

**धनराज अग्रवाल :-**

डंपिंग ग्राउन्ड किती आहे?

**राजकुमार कांबळे :-**

एकच आहे.

**धनराज अग्रवाल :-**

एकच आहे आणि मग तुम्ही हा विषय कुठला आणला? सोसायटीमध्ये अलग अलग कचरा गोळा करुन आणणे.

**राजकुमार कांबळे :-**

प्रस्ताव आल्यानंतर करणार.

**मोहन पाटील :-**

प्रस्ताव आले नाहीत आणि तसे प्रस्तावित करता येत नाही. तुम्ही हयाची प्रशासनाची आर्थिक मंजुरी घेतली का? कशाला तुम्ही अडकता आणि आम्हाला अडकवता? प्रशासकीय आर्थिक मंजूरीने काम चालते तर चालू दे. मग कशाला स्थायी समितीच्या सभापतींना येथे बसवायचे, नुसता खुर्चीवर बोज आमचा त्यांचा.

**धनराज अग्रवाल:-**

डिझाल्व्ह करा काम चालले आहे चालू दे तिथेच.

**आसिफ शेख :-**

असे कसे डिझोल्व्ह करणार, आपल्याला लोकांनी येथे निवडून पाठवले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

मग त्यांना परत पाठवा.

**मोहल पाटील :-**

सभापती महोदय प्रशासकीय आर्थिक मंजूरी कोणत्याही विषयाला पाहिजे असते. त्याशिवाय होत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या वेळेला माझी हीच मारामारी झाली सगळे अवलोकनाचे विषय आपल्याला अवलोकन करण्याकरीता पाठवतात. हे सगळे कार्यक्रम अगोदर आटोपते कसे ?

**धनराज अग्रवाल :-**

आर्थिक प्रशासकीय मंजूरी घेतलेली नसेल तर विषय फेटाळून लावा. ह्या लोकांनी आर्थिक प्रशासकीय मंजूरी घेतली नाही.

**मोहन पाटील :-**

विषय दाखवा नाकाडी साहेब आपण माहिती द्या.

**मिलन म्हात्रे :-**

केळकर साहेब, ह्याच्यामध्ये २५ सप्टेंबर २००२ आपल्याला निविदा प्राप्त झालेल्या आहेत. नागरिकांना व्यवस्थापन व हाताळणी नियम लागू झालेले आहेत. ह्याच्यामध्ये फक्त तीन कंपनीची नावे दिलेली आहेत. त्या तीन कंपन्या कुठल्या मानत्याप्राप्त कंपनीचे औषध देणार आहेत. ते काहीच दिलेले नाही. म्हणजे आता ही ग्रीन गोल्ड एनर्जी कमल एन्टरप्रायझेस विश्व मार्केटींग हे कुठची घेणार आहेत. बेगॉनचे औषध आहे का आणखीन दुसरे कुठले आहे. ह्याचा कुठेही खुलासा नाही आहे. ह्या कंपन्याच्या नावाने रेप्युटेड पर्सन असे वाटत नाही. वेगळया कंपनीचे, आय.एस.आय. ट्रेड मार्क असलेले कंपनीचे औषध देणार आहेत का, ह्या कंपन्या? ह्याच्यामध्ये एक कंपनी १०५ बोलते आणि दुसरी कंपनी फक्त ६० बोलते.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब ह्या विषयाला आपल्याकडे आर्थिक प्रशासकीय मंजूरी नाही आणि त्या उपर हे टेंडर काढलेले आहे त्याच्यामुळे आर्थिक प्रशासकीय मंजूरी घेतल्यानंतर हा विषय आणावा आणि विषय आणताना तो कुठल्या व कशाकरिता आपण बायोकल्चर वापरणार आहोत.

नेमकी काय प्रक्रिया करणार आहोत ही खुलासेवार माहिती स्थायी समितीला द्यावी आणि हा विषय आर्थिक प्रशासकीय मंजूरी करीता पुढच्या सभेत घेण्यात यावा.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, आर्थिक प्रशासकीय मंजूरी घेतली नसताना देखील टेंडर पहिले काढले कसे?

**चंद्रकांत वैती :-**

याबाबत आपण योग्य तो खुलासा मागू या.

**धनराज अग्रवाल :-**

खुलासा मागवावा.

**चंद्रकांत वैती :-**

याबाबत संबंधीत अधिकाऱ्याकडून खुलासा मागवून घेऊ.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय हे घनकचरा व्यवस्थापनाचे एक दिड वर्षापासून चालले आहे व डॉक्टर साहेबांना त्यासाठीच आणले होते. ते का होत नाही? पुढे पुढे काहीतरी नविन नविन वस्तू रोज रोज येते आणि कुठले काम होतच नाही.

**चंद्रकांत वैती :-**

याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आपण योग्य तो खुलासा मागवून घेऊ.

**अशोक पाटील :-**

आपण त्या आरोग्य विभागाला खरबरीत पत्र द्या की, आपण निविदा काढल्या आर्थिक प्रशासकीय मंजूरी नसताना हा काय हलगर्जीपणा चालला आहे.

**चंद्रकांत वैती :-**

आरोग्य खात्यांना आणि कार्यालयीन उपायुक्त केळकर साहेब ह्यांनी याबाबत खुलासा द्यावा.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याला टाईम बॉण्ड लिमिट काय आहे? किती दिवसांत तुम्ही तो खुलासा मागवणार? अन्यथा खुलासा सहा महिने येत राहिल.

**चंद्रकांत वैती :-**

तसा ठराव द्या पंधरा दिवसात आपण खुलासा मागवून घेऊ.

**मिलन म्हात्रे :-**

एक आठवड्यात ह्या पंधरा दिवसात कशाला ही औषध खरेदी आहे.

**चंद्रकांत वैती :-**

एक आठवड्यात खुलासा मागवून घ्या. तसा तुम्ही ठराव घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

पुढच्या सभेत एक आठवड्यात त्यांनी घ्यावे.

**आसिफ शेख :-**

आपण आदेश काय दिले.

**चंद्रकांत वैती :-**

असा ठराव घेऊन आपण सात दिवसात संबंधीत अधिकाऱ्यांकडून खुलासा मागवून घेऊ.

**मिलन म्हात्रे :-**

आपण आरोग्याची जी सभा लावतोय. त्याच्या अगोदर तो खुलासा द्यावा. भरपूर वेळ आहे. चार दिवस मिळतात.

**चंद्रकांत वैती :-**

आपण एका आठवडयात त्याचा खुलासा मागतोय त्या दरम्यान आपण आरोग्य खात्याची सभा बोलावू शकतो.

**मोहन पाटील :-**

पिठासीन अधिकारी साहेब आपण असा खुलासा मागितला आहे. आम्ही खुलासा पत्र देतो आणि संबंधीत अधिकारी जर ह्याच्यामध्ये गुंतले असतील तर त्याची संपुर्ण जबाबदारी आपण घेतली पाहिजे आणि आपण कार्यवाही केली पाहिजे. नुसता ह्या गोष्टीचा खुलासा नाही पाहिजे.

**चंद्रकांत वैती :-**

संबंधीत अधिकाऱ्यावर तशा प्रकारची कार्यवाही होईल.

**प्रकरण क्र. ४५**

बायोकल्चर खरेदी करणे कामाची निविदा मंजूरी.

**ठराव क्र. ५४ :-**

मा. सभापती सो. यांच्या आदेशानुसार सदरचा विषय तहकुब करण्यांत आला.

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांना प्रकरण क्र. ४६ चे वाचन केले)

**मोहन पाटील :-**

ही वाहने कोणाकरीता आणली आहेत? कोणाकोणाला गाडया हव्या आहेत आणि कोणाकोणाला गाडया दिलेल्या आहेत ह्याचा संपूर्ण तपशिल द्या.

**शरद पाटील :-**

आणि मागच्या वेळेला किती खर्च झालेला आहे ते देखील द्या.

**धनराज अग्रवाल :-**

गाडयांचा तपशिल द्या.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

यासंबधी करविभाग, आरोग्य विभाग आणि वेळोवेळी शासनाकडून गाडया आपल्या रेप्युझेशन केल्या जातात. त्यावेळी संबंधीत अधिका-यांचे गाडया घेणार होत्या.

**मोहन पाटील :-**

शासनाकडून रेप्युझेशन का केल्या जातात?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

गाडी रेप्युझेशन केल्या जातात.

**मोहन पाटील :-**

का ?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

आता काल परवाच दोन गाडया रेप्युझेशन केल्या आहेत.

**मोहन पाटील :-**

ज्या महापालिकेत गाडया नाही. पुर्ण ठाणे जिल्ह्यामध्ये कल्याण डोंबिवली, नवी मुंबई, ठाणे महानगरपालिका, भिवंडी महानगरपालिका अशा श्रीमंत महानगरपालिका आहेत. फक्त आपली नगरपालिका होती त्याच्यासमोर आयुक्त साहेब महा हा शब्द आणला पण बजेटने आपण महा झालो नाहीत आणि अशा पद्धतीचे जर रेप्युझेशन होत असेल. तत्कालीन मुख्याधिकारी, तत्कालीन आयुक्त नाईक साहेब होते तर त्यांनी ब-याच वेळा प्रश्न मांडला की, ह्या गाड्या आपण का दिल्या पाहिजे. आपल्याकडे गाड्या नसताना आपण आपल्या गाड्या त्यांना का द्यायच्या आणि अजूनपर्यंत तुम्ही कोणता निर्णय घेतला नाही आणि तुम्ही त्यांना जर गाड्या देत असाल तर हा जो सर्वसामान्य करदाता आहे. तर त्या करदात्यावर आपण अन्याय करतोय. त्याच्या पैशाचा आपण दुरुपयोग करतोय.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

बी.पी.एम. रेप्युझेशन ॲक्टनुसार गाडी कलेक्टरने रेप्युझेशन केल्यानंतर जिल्हा दंडाधिकारी म्हणून ते गाडी रेप्युझेन करतात आणि गाडी जर रेप्युझेशन केली नाही तर त्या संबंधीत अधिका-यावर फौजदारी कारवाई करण्याचा अधिकार जिल्हा दंडाधिकारी यांना आहे आणि या रेप्युझेशन आदेशास कोणत्याच स्थिती नकार देऊ शकत नाही. कालच एक आदेश आला रेप्युझेशनचा एक महिन्यासाठी इलेक्शन कामाच्या मतदार यादीच्या नोंदीकरिता गाडी मागविली आहे.

**मोहन पाटील :-**

इलेक्शन कमीशनचे जे आदेश आहेत ते आम्ही मान्य करतो. पण अजूनपर्यंत आपण मिरा भाईंदर नगरपालिका झाल्यानंतर, ग्रामपचांयत, नगरपालिका व आता महानगरपालिका झाल्यापासून अजूनही आपण रिक्वीझेशनच्या अखत्यारीमध्ये जिल्हाधिका-यांमध्ये मोडतो का ?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

आहे. सर्वांच्याच गाडया रिक्वीझेशन केल्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

केळकर साहेब, आपण हा विषय काढलात गाडया आमच्या वापरतात वर्षानुवर्ष झाल्या व काही गाडया खटारा झाल्यात त्याचे काय झाले, त्याला कुठचा कायदा आहे. नविन को-या गाडया कलेक्टर साहेबांनी वापरल्या आणि त्या खटारा झाल्या तरी त्यांनी परत केले नाही तो कुठचा नियम आहे ते सांगा.

**मोहन पाटील :-**

महापालिका झाल्यानंतर जिल्हाधिकारी आपल्या गाड्या वापरु शकतो का?

**मिलन म्हात्रे :-**

आता तुम्ही सांगता की, इलेक्शन आहे पण त्या एक महिन्यानंतर ती गाडी परत आली पाहीजे. वर्षवर्षभर कलेक्टर ती गाडी वापरतो म्हणजे काय?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

गाडी वापरण्याचे त्यांना अधिकार आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

काही अधिकार नाही. कोण सांगतो तुम्हाला ? तुमच्या गाडया ते वापरतात. अट आहे एका महिन्यापुरती गाडी वापरण्याचा अधिकार आहे.

**धनराज अग्रवाल :-**

वापरण्याचे की देण्याचे अधिकार आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

त्या पत्रात एक महिन्याकरीता वापरण्याचे अधिकार आहेत. त्या पत्रामध्ये कालावधी असतो की, ह्या कालावधी पर्यंत त्याच्यानंतर कलेक्टर किंवा कोणीही गाडी ठेवू शकत नाही. तुम्ही लोकांना हिमंत होत नाही कलेक्टर ऑफीसला पत्र लिहायची.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मा. सभापती साहेब, हा दोष निव्वळ प्रशासनाचा आहे असे नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या सभेत तर सरळ सांगितले की, कोण त्यांच्याशी पंगा घेईल हे शब्द आपल्या प्रोसिडींगला आले आहेत. पंगा घेईल म्हणजे काय? जो तुमचा हक्क आहे तो आपण मागितला पाहिजे आमची गाडी पाहिजे. एक महिन्यामध्ये ती रिटर्न आली पाहिजे. कलेक्टर दोन दोन गाडया डिझेल, पेट्रोल सगळा खर्च आपला करतो. ड्रायव्हर आपला आहे.

**आसिफ शेख :-**

त्यांनी चार गाडया मागितल्या तर आपण त्यांना दोन गाडया द्या.

**मिलन म्हात्रे :-**

कोणी सारवा सारवीची बाजू घेऊ नका. तुमचा नगरविकास आणि महसूल तुमच्याकडे ठेवा. आमच्या नगरपालिकेच्या गाडया आमच्याकडे पाहिजेत. तुमचा टाईम झाला की, गाडया येथे पाहिजेत.

**कल्याण केळकर(मा. उपआयुक्त सो.) :-**

सर्व सन्मा. सभासदांना विनंती आहे की, आपण सर्व जिल्हाधिका-यांकडे चला का चलू नये. येथे बोलणे साधी गोष्ट आहे.

**मिलन म्हात्रे :-**

चला मी येतो मी पत्र देतो.

**कल्याण केळकर(मा. उपआयुक्त सो.) :-**

तिथे एकाही पदाधिका-याची हिम्मत नाही, तिथे जावून आपली बाजू मांडण्याची हिम्मत सर्व सदस्यांनी दाखवावी.

**मिलन म्हात्रे :-**

मी आज पत्र देतो कुरियर द्या, माणूस द्या मी आता पत्र देतो.

**कल्याण केळकर(मा. उपआयुक्त सो.) :-**

आम्ही कमीत कमी दहा वेळा पत्र दिलेले आहे. आणि दहा वेळा पत्र देऊन सुध्दा काहीच झाले नाही.

**मोहन पाटील :-**

सन्मा उपायुक्त ह्यांनी ज्या पद्धतीने या ठिकाणी संभाषण केले ते आम्ही मानतो. परंतू अशा पद्धतीने आपल्याला अन्यायकारक झाले की नाही. महानगरपालिकेवर अन्यायकारक होते. सर्वसामान्य

करदात्याच्या पैशाचा दुरउपयोग होतोय. याकरीता आपण आम्हाला झालेला पत्रव्यवहार द्यावा आणि मग आम्ही सांगतो की, कायदेशीर आणि लोकशाही तत्वाने आम्ही जिल्हाधिका-यांकडे जाऊ शकतो. परंतू तुमच्याकडून आम्हाला माहिती मिळायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही आम्हाला पत्र दिले कुठे ?

**मोहन पाटील :-**

तुम्ही आम्हाला पत्र देत नाही, माहिती देत नाही. सभापती महोदय आपण आम्हाला अगोदर माहिती द्या.

**मिलन म्हात्रे :-**

आपण आम्हाला माहिती द्या आम्ही आज पत्र देतो. जिल्हाधिकारी आणि कमिशनरांना देखील पत्र देतो. चोरी नाही आम्हाला दोन गाडयांचा सत्यानाश झाला, नविन को-या गाडया येथून घेऊन गेले. हे कुठल्या कायद्यामध्ये बसते ते सांगा ? दोन-दोन वर्ष, तीन तीन वर्ष गाडया राहतात म्हणजे खायचे काम आहे का? डिझेल आपण टाकतोय, पेट्रोल आपण टाकतोय मेनटेन्स आपला आहे, गॅरेजचे बिल आपले आहे. कुठच्या कायद्यात येते ते सांगा. ए.सी. गाडया कशाला पाहिजे त्याचे उत्तर द्या आम्ही ए.सी. गाडया घ्यायची गरज आहे का ? ए.सी. गाडीला आम्ही मंजूरी देणार नाही. साध्या गाडया पाहिजेत मी तर म्हणतो रिक्षा घ्या आपण टी. एम्. टी. ने स्वतःच्या रिक्षा देखील घेतल्या आहेत.

**मोहन पाटील :-**

सन्मा सदस्य म्हात्रेजी आपण त्यांना प्रथम यांच्या बाबतीत उत्तर देऊ द्या.

**मिलन म्हात्रे :-**

ते सगळे पॅचअप असते.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

पॅचअप वगैरे काही नाही वस्तुस्थिती मांडतोय.

**मिलन म्हात्रे :-**

आपण कुठली वस्तुस्थिती मांडता. जिल्हाधिका-यांनी एवढया वर्ष गाडी वापरली आणि खटारा केली ती वस्तुस्थिती आहे. तुमची गाडी खटारा झाली, भंगार झाली त्या गणेश गॅरेजची बिल किती आहेत ते काढा वाहन विभागाला सांगा आणि टायर केवढे चढवले ते सांगा ती वस्तुस्थिती आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मा. सभापती साहेब, हा निव्वळ प्रशासनाचा दोष आहे असे मानता येणार नाही. ज्यावेळी नगरपालिकेची स्थापना झाली व नगरपालिकेची स्थापना झाल्यापासून को-या गाडया स्वतः न वापरता पदाधिका-यांना गाड्या दिलेल्या आहेत. निव्वळ प्रशासनावर धोबी पछाड करणे हे योग्य नाही. कारण ज्यांनी नगरपालिकेपासून गाडया दिल्या त्या परत मागितल्या नाही आणि आम्हाला नको तुम्हीच वापरा म्हणून पदाधिका-यांनी सांगितले. त्यामुळे प्रशासनाला जुमानतील असे वाटत नाही. हा विषय जो आता आलेला आहे ह्या विषयाची तुम्ही पाहणी करा. ह्या विषयामध्ये फक्त पल्स पोलिओ लसीकरण, कर वसूली.

**मोहन पाटील :-**

साहेब, तुम्ही दुस-या विषयावर जाऊ नका आपण सांगा की ज्या गाडया नगरपालिकेने बॉडीने दिल्या, जर मला तुम्ही इजार घातली पाच वर्ष असताना आणि मला पंधरा वर्ष झाली तर माझी इजार ऑटोमॅटीक फाटेल. तशी परिस्थिती झालेली आहे. नगरपालिका असताना आम्ही गाडया दिल्या आणि आता महानगरपालिका झाली. त्या गाडया दिल्यानंतर आपल्या नगरपालिकेच्या मिरा भाईंदर महानगरपालिकेला किती आर्थीक बोझा सोसावा लागतो ह्याच्याविषयी सदस्य कळकळीने बोलतात.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त सो.) :-**

याबाबत मी जे बोललो, सभागृहात बोलण्याचा विषय नाही. मी साहेबांशी चर्चा केली त्यामध्ये काय सांगायचे आहे ते मी सांगितले आहे. त्याप्रमाणे आम्ही कार्यवाही आज किंवा उद्या करू परंतू तो सभागृहात बोलण्याचा विषय नाही. सभागृहात बोलले की ते वेगळे होते आणि शासन व नगरपालिका ह्यामध्ये दुमत व्हायला सुरूवात होते. हा विषय जो आलेला आहे हा लसीकरण, पल्स पोलिओ आणि कर वसुलीसाठी, कर वसुलीकरिता फक्त आम्हाला डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी, मार्च ह्या महिन्यांसाठी दोन जीप पाहिजे आणि पल्स पोलिओसाठी हे रेट अॅप्रुव्हल करून ठेवायचे आहे आणि शासनाचे जस जसे ऑर्डर येतील.

**मिलन म्हात्रे :-**

त्याचवेळेला आपण घेतो. आपल्या गाडया कमी पडत आहेत म्हणून आपण घेतोय म्हणून हा विषय आला आहे. का, सभागृहात बोलले नाही पाहिजे, बोलले पाहिजे आमची इच्छा आहे बोलायची.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

ठराव करताना तुम्ही असेच म्हणा, पल्स पोलिओ लसीकरण झाल्यानंतर.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही तेच म्हणतोय जिल्हाधिका-यांच्या इथल्या गाडया ताब्यात घ्या. मी आज माझे पत्र देतोय, मला शिपाई द्या आणि तुम्ही गाडयासांठी मघाशी जो खुलासा केला तर माझे लेखी पत्र आहे तुम्हाला जिल्हाधिका-यांकडे कुठल्या गाडया आहेत. त्याचे नंबर द्या अजून त्याचे उत्तर येते. कशाला तुम्ही पदाधिका-यांचे काय बोलता. सभापती साहेब, आम्ही ह्या ए.सी. गाडयांना परमिशन देणार नाही. ए. सी. गाडयांची काही गरज नाही.

**मोहन पाटील :-**

सभापती साहेब, मेसर्स साई सिद्धी ट्रॅव्हर्ल्स आणि मेसर्स वीणा ट्रॅव्हल्स ह्या दोघांच्या भावामध्ये थोडा फरक आहे तर त्या दोघांना मिगोशिएशनला बसवून भाव एक करून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

ए.सी. गाडया पाहिजे नाही. ए.सी. काही गरज नाही.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब आपण ह्या दोघांना वाटाघाटी साठी बोलवा.

**मोहन पाटील :-**

साधी गाडी मागवा ए.सी. गाडी नाही पाहिजे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

ज्यावेळेला प्रोग्राम यईल त्याच वेळेल घेण्याचे आपण ठरावात म्हणा.

**मोहन पाटील :-**

जेव्हा आवश्यक बाब असेल तेव्हाच आपण गाडया मागवणार आणि आपण हा रेट मंजूर घेतो.

**मा. सभापती :-**

ज्यावेळी गाडया लागतील त्याचवेळी गाडया घेतल्या जातील.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, ए.सी. गाडयांचा रेट जास्त आहे.

**आसिफ शेख :-**

दोन्ही ट्रॅव्हल्सवाल्यांना वाटाघाटीसाठी बोलवा. त्यात प्रशासनाचा फायदा होणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ए.सी. गाडया घ्यायच्या नाहीत साध्या गाडया घ्या.

**दिनेश नलावडे :-**

सभापती महोदय, प्रकरण क्र. ४६ या विषयाचा ठराव मी मांडत आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

एखाद्या अधिका-यांची गाडी काढुन घेतली पंधरा दिवसासाठी तर त्या अधिका-याला त्या टेन्यूअरमध्ये गाडी द्यावी.

**मोहन पाटील :-**

ह्या ठरावाला माझे अनुमोदन आहे. पण अनुमोदन देण्यापुर्वी सभापती साहेब महोदय वीणा ट्रॅव्हर्ल्स मध्ये ए. सी. च्या गाडयांचा जो रेट दिला आहे त्यात तफावत आहे. तर त्यात वाटाघाटी करून त्या ठरावाला मी अनुमोदन देत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ए.सी. चा विषयच काढून टाका ए.सी. गाडया पाहिजेच नाही.

**मा. सभापती :-**

समजा उद्या आयुक्त साहेबांची गाडी बंद पडली, माझी गाडी बंद पडली तर आपल्याला ए.सी. गाडया घ्यायला भाग पडणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही घाई करू नका. जो अधिकारी गाडी वापरेल तेवढया पुरता ए.सी. लावण्यात यावा.

**मोहन पाटील :-**

उपायुक्त आणि पदाधिकारी ह्यांच्या जर गाडया बंद झाल्या तर त्याकरीता ए.सी. वापर करावा. अन्य कोणाला ए.सी. चा वापर करता येणार नाही.

**शरद पाटील :-**

तसा ठराव करा.

**चंद्रकांत वैती :-**

मुळ ठरावात तशी सुधारणा करा.

**दिनेश नलावडे :-**

ठरावामध्ये सुधारणा करून हा ठराव मंजूर झालेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या गाडया फिरतात त्याच्यावर नाव आहे का? ह्या जेवढया गाडया घेतल्या आहेत तर आम्हाला काहीच कळत नाही की, कुठली गाडी कुठे आहे ती? त्या गाडयांवर नावच नाही, मिरा भाईंदर महानगरपालिका असे.

**आसिफ शेख :-**

गाडीवर नाव टाका मिरा भाईंदर महानगरपालिका असे.

**मिलन म्हात्रे :-**

खराब वाटते का, त्या मालकांना ज्या गाडया तुम्ही आस्थापनेवर भाडयाने घेतल्यात त्यांना नाव लागले पाहिजे व ज्या डिपार्टमेंटला दिले त्याचे ही नाव पाहिजे.

**मा. सभापती :-**

कायम स्वरूपी थोडेच घेतल्या आहेत. त्या तर भाडयाने आहेत. तर कसे मिरा भाईंदर महानगरपालिका हे नाव लावणार.

**चंद्रकांत वैती :-**

जेव्हा डयुटीवर असेल तेव्हा नाव असावे.

**आसिफ शेख :-**

ऑन डयुटी असेल तेव्हा नाव असावे.

**प्रकरण क्र. ४६:-**

महानगरपालिका सन २००४-०५ या आर्थिक वर्षाकरिता वाहने वाहनचालकासह भाडे तत्वावर पुरवठा करणे.

**ठराव क्र. ५५ :-**

सदरचा ठराव इतिवृत्तांता सोबत जोडून देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४७ चे वाचन केले)

**मोहन पाटील :-**

मा. सभापती महोदय विषय क्र. ४७ बाबत महानगरपालिकेच्या बालवाडयातील विद्यार्थ्यांना एका वर्षाकरीता सकस आहार पुरविणेकामी स्थायी समिती सभा दि. १/७/०४ मधील प्रकरण क्र. ४७ च्या मंजूरी बाबत.

(दिलेल्या पत्राचे वाचन करून दाखविले)

**महोदय ,**

वरील विषयानुसार मे. आकांक्षा कॅटरेस ह्यांची निविदा मधील शेंगदाणे व गुळ, बिस्कीट या बाबीवरून इतर दर कमी आहेत. प्रशासनाने मे. आकांक्षा कॅटरेस ह्यांचे सर्व दरातील निविदा मंजूरीस शिफारस केलेली आहे. वास्तविक सावित्रीबाई फुले महिला विकास संघ ह्यांचे शेंगदाणे, गुळ व बिस्कीट, नाचणी व सोयाबीनयुक्त हे दर कमी असल्याने दोन बाबीकरीता त्यांच्या दराची शिफारस

करणे आवश्यक होते किंवा मे. आकांक्षा कॅटरर्स ह्यांना सदर दोन बाबीचे दर सावित्रीबाई फुले महिला विकास संघाएवढे करून घेतल्यास त्यात नगरपालिकेचा आर्थिक फायदा होणार आहे. तसेच मे. आकांक्षा कॅटर्स यांच्या मागील वर्षाचा अनुभव पाहता त्यांचा अत्यंत निकुष्ट दर्जाचा सकस आहार पुरवठा केलेला असून त्यांचे काम समाधान कारक नसल्याचे सदरची निविदा रद्द करून राज्यस्तरीय वृत्तपत्रात निविदा पुन्हा प्रसिद्ध करावी ही विनंती याबाबत मी पत्र सभापती महोदयांना दिले होते. २८ जून रोजी पण ह्या पत्राचे उत्तर मला आले नाही आणि आता आणि ह्या पत्राचा खुलासा करावा.

**मा. सभापती :-**

ह्याच्यात खुलासा काय करणार ? कमीत कमी निविदा आलेली आहे त्याला देणे भाग आहे.

**मोहन पाटील :-**

साहेब, सन्मा. सदस्यांनी पत्र दिलेले आहे. ह्या स्थायी समितीच्या अगोदर पत्र दिलेले आहे. त्याला वाटाण्याच्या अक्षता लावून चालत नाही. आपण बोला त्याच्यामध्ये टिपणी आलेली आहे चर्चेमध्ये की, अशा पद्धतीच्या निविदा कमी आहेत आणि निविदा कमी आहे त्याचे उत्तर द्या. आपले म्हणणे बरोबर आहे. त्याच्यानंतर सवित्रीबाई फुले ह्यांनी सुद्धा आपण मघासचे जे टेंडर निविदा मंजूर केले त्याबाबत मी आपणांस बोललो की, विना ट्रॅव्हलर्स जे आहे त्यांचे रेटमध्ये फरक आहे. तर त्यांना वाटाघाटीसाठी बोलावून ठरावामध्ये आपण ती तरतुद केलेली आहे. आपण पत्र मिळाल्यानंतर आपण वाटाघाटीकरीता बोलावले पाहिजे होते. सावित्री बाई फुले विकास संघ ह्यांना आपण जे त्यांचे रेट आहेत शेंगदाणे, गुळ त्यांचा रेट आहे चार रूपये एकोणपन्नास पैसे आणि त्याचा रेट आहे तीन रूपये त्यानंतर बिस्कीट नाचणी, सोयाबीनयुक्त त्याचा रेट आहे ४.५० रू. पैसे आणि त्यांचा रेट २.०० रूपये हा एवढा अडीच रूपयापेक्षा जास्त किती फरक आहे. पुन्हा १.०० रूपयाचा देखील फरक आहे. १.५० रुपयाचा एवढा फरक आहे आणि दुसरी गोष्ट मागच्या वेळेला आकांक्षाचा रिपोर्ट खराब आहे. त्यात बऱ्याच लोकांनी तक्रारी दिलेल्या आहेत. वेळेवर सामान पुरवत नाही अशा बऱ्याच तक्रारी आलेल्या आहेत. ठिक आहे, ते तक्रारी असू दे परंतू पुन्हा रेटमध्ये ॲनालेस करायला पाहिजे होते. पत्र मिळाल्यानंतर आपण वाटाघाटीसाठी बोलावले पाहिजे होते. नाकाडी साहेब असे पत्र आम्ही आपल्याला दिलेले आहे, पत्र आलेले आहे.

**मा. सभापती :-**

टेंडर पास झाल्यानंतर काय पत्रव्यवहार करणार आहे ?

**मोहन पाटील :-**

टेंडर पास झालेले नाही अजून ते पास व्हायचे आहे.

**मा. सभापती :-**

आता करतो.

**मोहन पाटील :-**

आता कसे करणार मी आपल्याला पत्र अगोदरच दिलेले होते.

**मा. सभापती :-**

अगोदर पत्र दिल्याचा अर्थ काय होतो ज्याची निविदा लोएस्ट आहे त्याला देणे भाग आहे.

**मोहन पाटील :-**

साहेब त्या रेटमध्ये आपल्याला दिलेले आहे. सावित्रीबाई फुले ह्यांना तीन रूपये रेट आहे आणि ह्यांना दोन रूपये रेट आहे.

**धनराज अग्रवाल :-**

टोटल बघितले तर आकांक्षा कॅटरेसचा कमी आहे.

**मोहन पाटील :-**

बरोबर आहे.

**धनराज अग्रवाल :-**

ह्यांचे ३.१७ होते आणि दुसऱ्याचे रेट ह्याच्या पेक्षा जास्त होणार.

**मोहन पाटील :-**

बरोबर आहे. मग आपण त्यांना बोलायला पाहिजे की, तुम्ही रेट कमी करता की नाही. सभेमध्ये पत्र आल्यानंतर कमी निविदा मंजूर करण्यात येईल. सभेच्या अगोदर पत्र आलेले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

सगळ्यात कमी १९.०० रूपये वाले आहे ३.१७ प्रमाणे बरोबर आहे. त्याची जर क्वॉलिटी बरोबर नसेल तर आपण त्याला दाखवून द्यायचे.

**मोहन पाटील :-**

वाटाघाटीला त्यांना बोलवायला पाहिजे.

**आसिफ शेख :-**

आपल्याला ह्या ठिकाणी जो गोषवारा आलेला आहे. त्या गोषवाऱ्या मध्ये देखील तफावत दिसते. ह्याच्यात अनु. क्र. १ मध्ये काय म्हटले की, मोड आलेली कडधान्ये, मसाल्यामध्ये तयार केलेली. त्यामध्ये साई कॅटरेसचे ५.६०, जितेंद्र कॅटरेस रु. ३.००, आकांक्षा २.७४, शिव किर्ती महिला मंडळ रु. ४.००, वज्रेश्वरी देवी संस्था ४.२५, सावित्रीबाई फुले महिला विकास केंद्र ७.००, स्त्री शक्ती ३.१०. ह्याच्यामध्ये आकांक्षाचा रेट कमी आहे. त्याची शिफारस करायला पाहिजे. दुसऱ्यामध्ये शेंगदाणे व गुळमध्ये सावित्रीबाई विकास केंद्राचा दर कमी आहे.

**मा. सभापती :-**

सरासरीने ठेवले आहे.

**मोहन पाटील :-**

पण वाटाघाटीकरीता बोलवायला पाहिजे.

**आसिफ शेख :-**

वाटाघाटीसाठी बोलवा आणि आमचा सांगण्याचा उद्देश असा की, वाटाघाटीसाठी बोलवा आणि सन्मा. सदस्य माजी सभापती मोहन पाटील ह्यांनी आपल्याला पत्र दिलेले आहे. आपल्याला त्यांचे पत्र आल्यानंतर आपण फेरनिविदा मागवा फेरनिविदा मागवायला हरकत नाही आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

महाराष्ट्र नगरपालिका अकाऊंट कोडप्रमाणे जो कमी दराचा निविदाधारक आहे. त्याच्याशिच वाटाघाटी करायची असते. अधिक दराचा निविदाधारक असेल तर त्याच्याशी चर्चा करणे हे बंधनकारक नाही आणि नियमात तरतुदसुद्धा नाही. ह्यांच्यामध्ये एकूण सात निविदा आल्यात.

**आसिफ शेख :-**

जर पालिकेचा आर्थिक फायदा होत असेल तर वाटाघाटीला का बोलवायचे नाही?

**मा. सभापती :-**

गेल्या वेळेला आपण सिक्युरीटी लोएस्ट वाल्यांना पास केले तर मग आपण त्यांना देखील वाटाघाटीकरीता बोलवा. लोऐस्ट दराच्या निविदेला आपण पास करतो.

**मोहन पाटील :-**

साहेब, आपण मला पत्राचे उत्तर द्यायला पाहिजे होते. आपण आम्हाला आधी सांगा की, आपण आमच्या पत्राचे उत्तर का दिले नाही. हे पत्र सभेच्या अगोदर २८ जूनला आपल्याकडे दिलेले आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

पत्र आमच्याकडे आलेले नाही.

**मोहन पाटील :-**

ह्याला जबाबदार कोण? सचिवजी जर हे पत्र आले नसेल तर ह्याला जबाबदार कोण? मुख्य लेखापरिक्षकाकडे पत्र घेऊन कोण जाते? त्यांना पत्र मिळाले नाही त्याला जबाबदार कोण? मग आपल्याला त्याचे उत्तर द्यायच नाही का? २८ जूनपुर्वी पत्र दिले होते तर त्याचे उत्तर आपण द्यायला पाहिजे होते. साहेब, मला प्रशासनाने पहिले उत्तर द्या. ह्यावर प्रशासनाला उत्तर द्यायचे नाही का?

**आसिफ शेख :-**

पत्र दिलेले आहे ते वाचून दाखविले त्यात फेरनिविदा मागवा असे सांगितले आहे.

(मा. उपायुक्त श्री. कल्याण केळकर सो ह्यांनी सन्मा. सदस्य मोहन पाटील ह्यांच्या पत्राचे सभागृहात वाचन करून दाखविले.)

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

ह्यापुर्वीच्या निविदा ह्या राज्यस्तरीय पत्रातच प्रसिद्ध केल्या होत्या. सामना आणि सुरज प्रकाश स्थानिक हे दोन जे शासन मान्य पेपर आहे. ह्या वृत्तपत्रामध्ये ह्या निविदा १०/६/२००४ रोजी प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या आणि त्यामध्ये एकूण सात निविदा आपल्याकडे प्राप्त झाल्या आणि त्यामध्ये एकूण सात निविदा आपल्याकडे प्राप्त झाल्या आणि सरासरी विचारात घेता. साई कॅटरेर्स ह्यांची २३.३० पैसे, जितेंद्र प्रभाकर १८.५५ पैसे, आकांक्षा कॅटरेर्स १९.०० रूपये, शिवकीर्ती १९.५०, वज्रेश्वरी २०.५० पैसे सावित्रीबाई २२.०० रू., स्त्री शक्ती २०.५० पैसे अशा पद्धतीच्या ह्या निविदा प्राप्त झाल्या

ह्याच्यामध्ये सरासरीने कमी दराची निविदा आकांक्षा कॅटरर्स ह्यांची असल्यामुळे मंजूरीसाठी प्रस्तावित करण्यात आलेली आहे. ह्यावर निर्णय सभागृहाने घ्यावयाचा आहे.

**मोहन पाटील :-**

माझे म्हणणे असे आहे की, पत्र दिल्यानंतर त्याला प्रशासनाने उत्तर द्यायचे नाही का? सभेच्या अगोदर २८ तारखेला पत्र दिल्यानंतर सभेपुर्वी उत्तर द्यायला पाहिजे.

**अशोक पाटील :-**

उपायुक्त साहेब आपण जो खुलासा केला तर प्रश्न असा उपस्थित होतो की जो सरासरी रेट आलेला आहे. त्याच्यातील कमी दराची निविदा आपण मंजूर करतो मोहन पाटील ह्यांनी आता ऑब्जेक्शन घेतले की, एका ठेकेदाराने दोन वस्तुंपूरता कमी रेट दिलेला आहे. आपली आर्थिक जर तशी बचत होत असेल व महापालिकेला जर त्याचा आर्थिक फायदा होत असेल तर आपल्याला तशी तरतुद करता येते का? असे नियमात आहे का ? हे आपण आम्हाला स्पष्ट करा एखादा सरासरी दराने कमी दिलेला आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मा. सभापती साहेब यामध्ये सर्वात लोऐस्ट १९.०० रू. आहे आणि १८.५५ पैसे वाल्यांचे होते आणि त्याने नकार दिल्यामुळे.

**मोहन पाटील :-**

जितेंद्र प्रभाकर म्हात्रे ह्यांनी आपल्याला नाही सांगितले. त्यांनी आपल्याला तसे पत्र दिले आहे. म्हणून ह्या दोघांना बोलवा माझे म्हणणे आहे की, ह्या दोघांना आपण वाटाघाटाकरीता बोलवा आणि जितेंद्र प्रभाकर म्हात्रे यांनी तर आपल्याला पत्राने उत्तर दिलेले आहे. तो प्रश्न मिटलेला आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

१८.५० पैसे जो नकार दिलेला आहे. त्याची बयाणा रक्कम जप्त केलेली आहे आणि १९.०० रू. त्यांचे कमी दराचे असल्यामुळे प्रशासनाने शिफारस केलेली आहे. आपण एखादी गाडी दुरूस्तीला दिली तर एकाने ब्रेकचे काम करणार व एकाने इलेक्ट्रिकचे काम करणार.

**मोहन पाटील :-**

साहेब, मी आपल्या उदाहरणाचे बोलत नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आपण आधी आमचे म्हणणे ऐकून घ्या.

**मोहन पाटील :-**

साहेब, पण त्याला महापालिकेचे आर्थिक नुकसान होता कामा नये याची दक्षता घ्या.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्यामध्ये आम्ही जो सर्वात लोएस्ट आयटम आहे, ते कमी करा म्हणून आम्ही बोलावले होते. तर तो कमी करायला तयार नाही. जर दर कमी केले तर मी नुकसानीत जाईन. त्यामुळे मी दर कमी करणार नाही असे पत्र दिलेले आहे आणि त्यात हे जे मटेरियल वाहतूक करायचे आहे ते सुद्धा त्यांच्याकडेच आहे. त्यांनी माल पुरवायचा आणि तो शाळेवर जाऊन द्यायचा आहे. तो सुद्धा त्यांच्या आयटमचा एक पार्ट आहे आणि आपण जर असे वेगवेगळे आयटम मंजूर करायला लागलो. तर त्यांचे एक वाहन येणार आणि ह्यांचे एक वाहन येणार त्यामुळे ते परवडणारे होणार नाही. म्हणून सर्व आयटम जर एकाच गाडीतून गेले तर ते योग्य ठरेल. समजा, इलेक्ट्रीकचे एकजण करणारे, एक जण पंक्चर काढणारे, एक जण कलर देणारा आहे. गाडी एकाच ठिकाणी लावल्यानंतर दुरूस्ती योग्य होते. जर वेगवेगळया ठिकाणी करायचे झाले तर सांगाडा उचलून न्यावा लागेल. मग ते काम त्याने करावे ते झाल्यानंतर दुस-या गॅरेजला जावे मग तिस-या जावे हे असे होऊ नये म्हणून आम्ही एकाच व्यक्तीचे टेंडर आणि नगरपालिकेच्या हिताचे कमी दराचे आहे आणि त्याचे आयटम दर सर्वात कमी आहे व त्या आयटमचे दर कमी करण्यासाठी आम्ही बोलावले होते. बोलावून देखील त्याने दर कमी करायला नकार दिला. हे नगरपालिकेच्या हिताचेच आम्ही शिफारस केलेली आहे. यामध्ये वेगवेगळया आयटमचे दर वेगवेगळे मंजूर करायला गेले तर मग ते परवडणारे नाही आणि ती व्यक्ती नकार देईल कारण आम्हाला दोनच आयटम दिले आणि त्यासाठी मी गाडी करू का? असे विचारणार आपण कुठलीही वस्तु खरेदी करताना किराणा दुकानात गेल्यानंतर आपण शंभर दुकानात फिरून वेगवेगळी वस्तू घेत जात नाही. आपण किराणा दुकानात गेल्यानंतर जे आयटम आहेत. जे खात्रीशीर किराणा दुकान आहे त्यांच्याकडेच सगळे आयटम आपण घेतो आणि त्या व्यक्तीला आम्ही दर कमी करायला बोलावले व त्यांनी नकार दिला. जर एक वस्तू पहिली पोच झाली आणि दुसरी वस्तू यायला उशिर

झाला. तर ते मुलांना एकाच वेळी मिळणार नाही.  या सारासर गोष्टीचा विचार करून माझी सभासदांना नम्र विनंती आहे की, आपण ह्यावर निर्णय घ्यावा.

**मोहन पाटील :-**

सन्मा. उपायुक्त साहेब ह्यांनी ह्या ठिकाणी जो खुलासा केला. आम्ही मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आर्थिक प्रश्नाबाबत या ठिकाणी चर्चा केली, त्याला वाहतुकीला किती महाग पडणार आहे आणि त्याने वहातूक करावे की, नाही करावे हा त्याचा प्रश्न आहे.  तो आमचा प्रश्न नाही आहे. माझा प्रश्न असा होता की, २८ जूनला आम्ही तुम्हाला पत्र दिले तर आपण त्या पत्राचे उत्तर आम्हाला का दिले नाही की, अशा पद्धतीने आम्ही वाटाघाटीला बोलावले आहे.  आपण त्याचे उत्तर ही दिले नाही आणि सरळ सभेला विषय आणता आणि अगोदर पत्राचे उत्तर देत नाही.  प्रशासनाचे काय ठरवले आहे?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

आपली इच्छा असली की, आयटम व्हाईस करा आणि ज्यांची कमी आहे. शेंगदाणे, गुळ एकाकडे द्यायचे तर त्यांच्याकडे द्या. दुसऱ्याकडे दुसरी वस्तु द्या. असे आयटम ज्यांचे कमी आहेत ते मंजूर करा. ह्यावर आमचे काही म्हणणे नाही.

**मोहन पाटील :-**

मंजूर करा, हा विषय वेगळा आहे. जर मिरा भाईंदर महानगरपालिका झाल्यानंतर जर आपण वाटाण्याच्या अक्षता पत्रांना लावतोय ही सवय अशीच सुरू राहणार आहे का ? हे काम सुरू होणारच आहे का? सभापती महोदय, बोलले सभागृहांपुढे विषय आला तर तो मंजूर करायचा आहे. पण हे सभागृहापुढे यायच्या अगोदर पत्र दिलेले आहे. आजची तारीख आणि अठ्ठावीस तारखेमध्ये किती दिवसाचा फरक आहे. तर त्याच्यामध्ये आम्हाला कमीत कमी प्रशासनाने, सभापती महोदय ॲज अ बॉडी म्हणून त्यांना त्या पत्राचे भान नसेल, त्यांनी भान ठेवले नसेल तर तो त्यांचा प्रश्न आहे. ते पदावर आहेत पदसिद्ध सभापती म्हणून आहेत.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

पण ते पत्र त्यांच्या पर्यंत गेलेले नाही.

**मोहन पाटील :-**

साहेब, आपण मला बोलू दे बरोबर आहे. मग प्रशासनाने असेच करायचे का दरवेळेला आणि दिलगिरी व्यक्त करायची का ?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

दिलगिरी व्यक्त करत नाही, उत्तर द्यायला पाहिजे हे मान्य आहे.

**मोहन पाटील :-**

मग का उत्तर दिले नाही हे आपण आम्हाला सांगा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

आता येथे सिटी इंजिनिअर आहेत त्यांना विचारा जर एका आयटम रेटचे टेंडर काढले.

**मोहन पाटील :-**

साहेब आपण तो खुलासा देवू नका.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

आपण अमान्य करा ना!  आम्ही आपल्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

**मोहन पाटील :-**

तुम्ही समजावून सांगितले ना?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

जर रस्त्याचे टेंडर काढले तर खडीचे वेगळे डांबराचे वेगळे असे आयटम करतो. आयटम करतो आयटम रेट वेगवेगळया करतो त्याची बेरीज करतो मग आपण दगडाला वेगळा माणूस, मुरूमाला वेगळा माणूस, डांबर टाकायला वेगळा माणूस असे करतो का? आपल्याला एका रस्त्याचे काम करायचे आहे.

**मोहन पाटील :-**

नाईक साहेब आपण विषय का फिरवता ? एकतर आपण एका बाजूने बोलता की, तुम्ही हे मान्य करायचे आहे की, कमी कोणते आणि जास्त कोणते.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

आपण निर्णय घ्यायचा आहे आणि समजावून सांगण्याचे काम आम्ही केले आहे.

**मोहन पाटील :-**

मग तुम्ही हा निर्णय आमच्या समोर ठेवलात ना.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

पत्राचे उत्तर दिले नाही हे आम्हाला मान्य आहे.

**मोहन पाटील :-**

तुम्ही आता बोललात ना, जर कोणते कमी घ्यायचे जास्त घ्यायचे ते ह्या सभेने ठरवायचे दुसरा विषय माझा असा आहे की, सभा निर्णय घेईल जर आर्थिक फायदा होत असेल मिरा भाईंदर महानगरपालिकेचा तर आज निर्णय घ्यायचा की घेऊ नये हे सभेने ठरवायचे आहे. तसेच २८ जूनला आपल्याला पत्र दिलेले आहे आणि पत्र अगोदर देऊनही आपण त्याचे उत्तर दिलेले नाही की, आम्ही ह्यांना वाटाघाटीकरीता बोलावले होते का नव्हते. पण ह्यांनी आम्हाला उत्तर दिले नाही. ह्याचे प्रशासनाने उत्तर द्यावे की आम्हाला का उत्तर दिले नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

बारनिशीला सांगायचे पाहिजे जर सभापती साहेबांचे पत्र असेल तर वेळेवर पोच करा.

**चंद्रकांत वैती :-**

मा. सभापती साहेब, सन्मा. स्थायी समिती सदस्य मोहन पाटील साहेब यांनी पत्र दिले होते. त्यांनी फक्त मागणी केली होती की, याबाबत योग्य ती कार्यवाही झाली पाहिजे पत्रानुसार त्यांनी जे रेट बार्गिनिंग होती तर त्याच्यातून महापालिकेचा आर्थिक व प्रशासकिय फायदा कसा होईल ही बाब त्यांनी निदर्शनास आणली होती आणि त्यांनी एक मुद्दा बनविला की, माझ्या पत्राला उत्तर मिळालेच पाहिजे होते. त्यांना त्याचा खुलासा अपेक्षित होता. अन्यथा लोएस्ट आहे त्याला टेंडर मिळाले पाहिजे ही भावना त्यांची त्यांनी बोलून दाखविली आणि आताच बालवाडया सुरू झालेल्या आहेत त्यांना आपण महापालिकेमार्फत सकस अन्नपुरवठा करत असतो. सर्वांचे रेट पाहिल्यानंतर सर्वांमध्ये थोडाबहुत फरक आहे आणि अठरा रूपये पंचावन्न पैसे ह्या कमी निविदावाल्यांनी ही निविदा स्विकारण्यासाठी नकार दिलेला आहे आणि स्वाभाविकच आकांक्षा कॅटर्सची एकोणीस रूपयाची निविदा मंजूरीसाठी आपल्या चर्चेमध्ये आहे. मात्र सन्मा. मोहन पाटील साहेबांनी सांगितले की, हे रेट कमी दराचे आहे जर त्यांच्यामते बसून तो मुद्दा जर सुटत असेल तर त्या पद्धतीने एकत्र बसवावे. तसे नसेल आणि मोहन पाटील साहेबांचा जर नुसता अट्टाहास असेल की, मला उत्तर मिळालेच पाहिजे होते तर ते का मिळाले नाही. आताच सन्मा. उपायुक्त नाईक साहेबांनी सांगितले की बारनिशीमधील त्या कर्मचाऱ्यावर कार्यवाही करण्यात येईल त्याला जाब विचारण्यात येईल. तर त्यांच्या संबंधीत खात्याकडे ताबडतोब ते पत्र वर्ग का करण्यांत आले नाही? म्हणजे कारवाई करता आली असती. एकूण परिस्थिती पाहता ते पत्रच संबंधित अधिकाऱ्याकडे पोहोचले नव्हते म्हणून उत्तर देवू शकले नाहीत अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. तर आजच्या ह्या परिस्थितीला आपण म्हणजे सगळीच पत्र कार्यक्षमतेने पुढे जातील तर ह्या सकस अन्नपुरवठेला कमीत कमी जी निविदा आहे त्याला मान्यता द्यावी. जर आज सभागृहाचे असे मत असेल की, ह्यातील दोन-तीन रेटसाठी वाटाघाटी करायचे तर ते करून घ्यावे आणि ह्या विषयाला मंजूरी द्यावी.

**दिनेश नलावडे :-**

अनुमोदन देत आहे.

**चंद्रकांत वैती :-**

त्यात जे दोन रेट कमी आहेत त्याच्यात वाटाघाटी करून घ्या.

**मा. सभापती :-**

असे कसे होणार सरासरीने रेट काय आहे.

**दिनेश नलावडे :-**

हे असे कसे होईल. उपायुक्त साहेब बोलले सरासरी एकोणीस रूपये एवढा भाव आलेला आहे.

**मोहन पाटील :-**

ठराव मांडल्यानंतर आपण अनुमोदन दिल्यानंतर जर त्याला असे उत्तर देत असाल.

**मा. सभापती :-**

जी लोऐस्ट अमाऊंट आहे तिच आपण घेतो.

**मोहन पाटील :-**

आपण वाटाघाटी करू शकतो.

**मा. सभापती :-**

आपल्याला वाटाघाटी अर्थ समजतो का नाही.

**मोहन पाटील :-**

ठराव मांडला आणि त्याला अनुमोदन दिले.

**मा. सभापती :-**

ठराव कोणी मांडला? ते बोलतात, त्यांना स्पष्ट करू दे की काय बोलायचे आहे. त्यांनी ठराव मांडला आहे आणि अनुमोदन दिले त्यांना ठराव मांडला आहे आणि अनुमोदन दिले त्यांनी स्पष्ट करावे की, कोणाला द्यायचे लोऐस्टला द्यायचे की, दोघांना एकत्र बोलवायचे

**चंद्रकांत वैती :-**

मी असे म्हणालो होतो की, कमीत कमी जी निविदा आहे ती मान्य करण्यासाठी मोहन पाटीलांची काही हरकत नाही परंतु त्यांनी पत्र दिले होते आणि त्यांनी सांगितलेले आहे. पत्र योग्यवेळी संबंधीत खात्याकडे पोहचले नाही म्हणून आपण त्याच्यावर कार्यवाही करू शकलो नाही. जर तसा अट्टाहास मोहन पाटलांचा असेल तर संबंधीत दोन आयटमसाठी त्यांना बसवा आणि ते किती मोठे महागडे आयटम आहेत.

**मा. सभापती :-**

बालवाडया चालू झाल्या आहेत.

**मोहन पाटील :-**

बालवाडी सुरू झाली हे ठिक आहे मग अजून सकस आहार का सुरू झाला नाही. आपण येथे महानगरपालिकेचा आर्थिक फायदा करतोय की नाही.

**आसिफ शेख :-**

आपण त्यांना बोलवा आणि त्यांच्या सोबत सुसंवाद साधा.

**मा. सभापती :-**

आपली इच्छा काय आहे.

**मोहन पाटील :-**

येथे कुणाच्या इच्छेने चालत नाही तर कायद्याने चालते. आपण मिरा भाईंदर महानगरपालिकेचा आर्थिक फायदा बघतोय आणि जर महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होत असेल तर ते काम करायला हरकत काय आहे ? असे मला बोलायचे आहे. सभापती महोदय आपण ज्या पद्धतीने बोलता तर आपल्याला आर्थिक जबाबदारीने बोलत नाही याचा अर्थ असा होतो.

**मा. सभापती :-**

आर्थिक जबाबदारीच दाखविली आहे.

**मोहन पाटील :-**

मग आर्थिक फायदेचे आपण करावे. त्या ज्या दोन निविदा धारक आहेत त्यांना बोलावून जर वाटाघाटी केली तर आपले काय जाणार आहे. आपण कुठल्या कायद्याच्या बंधनात आहात.

**मोहन पाटील :-**

नाईक साहेबांनी आपल्याला हे ही सुचवले आहे की, तुमचा निर्णय घ्यायचा आहे. आपल्याला निर्णय घ्यायचा आहे. आपल्याला निर्णय सभेने घ्यायचा आहे.

**मा. सभापती :-**

बरोबर आहे. सभेने निर्णय घ्या.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य वैतीजी ह्यांनी मांडला की, त्यांना वाटाघाटीसाठी बोलावून करून घ्या. असा विषय झाला मग प्रश्न येतो कुठे ? आणि त्या ठरावाला अनुमोदन दिले.

**दिनेश नलावडे :-**

सभापती महोदय, सुचना आणि अनुमोदन झालेले आहे आणि आपण परत त्याच्यावर खुलासावर मागितलेला आहे. सभापती साहेब ह्या ठिकाणी आताच आपल्याला केळकर साहेबांनी सांगितले ज्यांचे टेंडर जास्त भावाचे आहे त्यांच्याशी बोलणी करण्याचा याठिकाणी प्रश्नच येत नाही. त्यांनी खुलासा दिलेला आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा सदस्य दिनेश नलावडेजी आपण अनुमोदन दिले आणि आपण असे कसे बोलता.

**हॅरल बोर्जीस :-**

नलावडेजी आपण अनुमोदन देता आणि आपणच खुलासा मागता.

**दिनेश नलावडे :-**

सभापती महोदय आपण जर सरासरी पाहिले तर एकोणीस हा दर कमी आहे आणि प्रशासनाचा आपण आर्थिक बाबतीचा विचार केलेला आहे. तर आपल्याला आहे हा जो एकोणीस रूपये दर आहे. त्यालाच मंजूरी द्यायला पाहिजे.

**मोहन पाटील :-**

पण आपणच ठरावाला अनुमोदन दिले की नाही ?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा.) :-**

कमी दराची निवीदा मान्य करण्याचे धोरण आहे.

**मोहन पाटील :-**

आपण जर त्यांना वाटाघाटीसाठी बोलावले तर महानगरपालिकेचे काय जाईल? ही महानगरपालिका एका पदसिद्ध आदेशाची होऊ शकेल का?

**(सभागृहात गोंधळ)**

**मोहन पाटील :-**

साहेब मला हे कळत नाही, विषय असा आहे ठराव मांडला अनुमोदन दिलेले आहे. वाटाघाटीला बोलावून काय सांगायचे आहे.

**मा. सभापती :-**

आपण सांगा कोणाला दयायचे आणि नाही.

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब, आपण ह्या दोन निविदांकरिता निगोशिएशन करा.

**मोहन पाटील :-**

आपण त्याला दयायला नाही बोलत नाही. पण ज्याचे रेट कमी आहे त्याला दयायला पाहिजे. पण निगोशिएनला बोलवायला हरकत काय आहे?

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब, जाऊ दे एका विषयाला कशाला प्रतिष्ठा बनवता.

**मोहन पाटील :-**

निगोशिएशनला बोलवायला हरकत काय आहे?

**दिनेश नलावडे :-**

आकांक्षा कॅटरर्सला बोलावले होते पण त्यांनी सांगितले की, आमच्या कडून भाव कमी होणार नाही आणि परत आपण त्यांना चर्चेला काय म्हणून बोलवायचे.

**जोजफ घोन्सालविस :-**

ही जी लोऐस्ट निविदा मंजूरीसाठी आलेली आहे तिच बरोबर आहे.

**असिफ शेख :-**

सन्मा. सभापती साहेब एक रामबाण उपाय सांगतो. एकूण सात लोकांनी निवीदा भरलेल्या आहेत. त्यामध्ये आपण एकूण दर विचारात घेतला तर एकूण जो दर आहे तो जितेंद्र प्रभाकर म्हात्रे यांचा १८.५५ पैसाचा आहे. मग त्याला बोलावून त्यालाच देवून टाका.

**दिनेश नलावडे :-**

त्यांनी नाही म्हणून सांगितले आहे व त्यांने तसे पत्र दिले आहे.

**मोहन पाटील :-**

मग आम्हाला उत्तर का दिले नाही की, आम्ही त्यांना वाटाघाटीसाटी बोलावले. आपण माझ्या पत्राचे का उत्तर दिले नाही आणि सन्मा. सदस्य दिनेश नलावडेजी आपण सुज्ञ सदस्य आहोत आपण एकदा ठरावाला अनुमोदन करता आणि पुन्हा आपण सूचना मांडता ही चुकीची पद्धत आहे.

**दिनेश नलावडे :-**

आपल्याला सन्मा. सभापती साहेबांनी खुलासा मागितला आणि त्याचा आपण खुलासा केला.

**मोहन पाटील :-**

दिनेश नलावडे आपण त्याला आताच अनुमोदन दिले. असे नाही की, त्याला एक तास गेला अवधी झाला. त्याच वेळेला ताबडतोब खुलासा दिला मग अनुमोदन देताना आपण खुलासा मांडायला पाहिजे. आम्ही अनुमोदन देता मागच्या टेंडरमध्ये खुलासा मांडला की नाही.

**मा. सभापती :-**

नलावडे ह्यांना माहित नसेल ठराव काय मांडला गेला.

**दिनेश नलावडे :-**

ठराव काय मांडला ते मला माहित होते नाही असे काही नाही पंरतु आणि मी त्या ठरावाला अनुमोदन दिले हे मी मान्य करतो पंरतु पुन्हा ह्या सभागृहात सभापती साहेबांनी विषय मांडलेला आहे व सभापती साहेबांच्या आदेशाशिवाय हा विषय मंजूर होऊ शकत नाही म्हणून पुन्हा क्लिअर केला.

**मोहन पाटील :-**

सचीवजी, मागच्या विषयामध्ये आम्ही विना ट्रॅव्हर्ल्सच्या ए.सी. गाडयामध्ये आम्ही तुम्हाला सुचवले आम्ही अनुमोदन दिले की, त्या दोघांना बोलावून तुम्ही त्यांचे निगोशिएशन करा असा ठराव मांडला. मग बंधन कुठे आले आणि सभापती महोदय बोलले असा लोऐस्टचा ठराव आला आहे तर लोऐस्टचा करायला पाहिजे. असे असताना ही आपण ठराव पास करतो की, ए.सी. गाडीमध्ये तफावत आहे त्याबाबत आपण दोघांना बोलावून चर्चा करावी असे सभापती महोदय आपण मान्य करतो मागच्याच विषयावर मान्य करतो आणि त्याचा पुढचा विषय हा आहे. त्याच्यामध्ये असे का होऊ नये.

**मा. सभापती :-**

विषय कुठला गाडयांचा. ह्यांच्यावर अधिका-यांनी चर्चा करावी आणि ज्यांचे लोऐस्ट असेल ह्याला करून दयावे.

**मोहन पाटील :-**

गाडयांच्या विषयामध्ये आपण ठराव असा मांडला की, विना ट्रॅव्हर्ल्सला ज्या गाडया आपण कमी केले त्यांच्याबद्दल आपण निगोशिएशन करा आणि बोला, चर्चा करून असा ठराव मांडला सेम हा ठराव आहे असे मी बोलतो.

**मा. सभापती :-**

त्याच्यामध्ये निगोशिएशन कशाला करायचे?

**मोहन पाटील :-**

मग अगोदरचा ठराव कसा मांडला. साहेब, आपण पिठासीन अधिकारी आहात म्हणजे आपले सभेमध्ये लक्ष नाही याचा अर्थ.

**मा. सभापती :-**

आपले ए. सी. बद्दल चालले आहे.

**दिपक खांबीत :-**

साहेब, वाटाघाटीसाठी बोलावले होते.

**मोहन पाटील :-**

मग ते लिहुन कोण देईल. ह्यांनी उत्तर दिले नाही म्हणुन ह्यांच्यावर कार्यवाही करु का, आम्ही.

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब, आजपर्यंत ह्या सभागृहाने जी निविदा कमी आहे त्यालाच आपण आजपर्यंत मान्यता दिलेली आहे. त्या नियमानुसार ही कमी निविदा आहे. त्याला मान्यता द्यायला आपली हरकत नाही. कारण हा विषय फार नाजुक आहे. बालवाड्या सुरु झालेल्या आहेत व त्यांना सकस आहार द्यायचा आहे.

**मोहन पाटील :-**

दिनेशजी नलावडे, येथे नामंजुरचा विषय नाही. परंतु ज्याप्रमाणे सभापती महोदयांनी सांगितले आणि आपले लक्ष थारावर नव्हते. आपण लक्ष थारावर ठेवुन बोलायचे आणि दुसरे म्हणजे येथे कुणाचा प्रेस्टीजचा विषय नाही. जर मागच्या विषयात आम्ही दुरुस्ती सुचवितो आणि आम्ही दुरुस्ती सुचवली का, जर मिरा भाईंदर महानगरपालिकेचा आर्थिक फायदा करीता दुरुस्ती सुचविली. पहिली गोष्ट की प्रशासनाने याबाबतीत कोणत्याही प्रश्नाचे उत्तर न देता सभा चालवायची, सभेमध्ये आलेल्या पत्राचे अक्षता वाटायला लावायची ही पद्धत सोडुन द्या असे मी तुम्हाला सांगतो.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

पत्र संबंधित विभागापर्यंत पोहचले नाही.

**मोहन पाटील :-**

प्रत्येकवेळी दिलगिरी व्यक्त करायचे त्याबाबत बोलत नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

दिलगिरी व्यक्त करायची नाही. तर पत्रच आले नाही डिपार्टमेंन्टपर्यंत त्याबाबत बोलतो.

**मोहन पाटील :-**

ही चुकी कोणाची आहे? आमची चुकी आहे का? सभापती महोदय, पत्र आल्यानंतर नियम आहे की, आपल्याला पत्र आलेले आणि आपल्याला निविदा आलेली आहे, सन्मा. सदस्य तो माजी सदस्य आहे किंवा सभापती आहे ह्याला महत्त्व नाही. तो स्थायी समितीचा सदस्य आहे आणि त्याच्या पत्राचे उत्तर दिले पाहिजे एवढी गांभीर्यता आपण पीठासीन अधिकारी म्हणुन घ्यायला पाहिजे आणि आपण आपल्या उपायुक्त प्रशासनाला सांगायला पाहिजे पण आपण तसे सांगितले नाही.

**मा. सभापती :-**

प्रशासनाने लक्ष द्यावे आणि ताबडतोब सर्वांचे पत्राचे उत्तर त्याच आठवड्यात देण्यांत यावे.

**मोहन पाटील :-**

मी माझी संचना ह्या ठिकाणी मांडलेली आहे. माझी सुचना आपण ग्राह्य माना. ठराव जो मांडलेला आहे त्याला अनुमोदन दिलेले आहे. ठरावामध्ये बदल करावा ही पुन्हा उपसुचना राहिल. सभापती महोदय, येथे समजुतदारपणाने कामे होतात, ॲग्जेस्टमेंटने काम होत नाही. जर त्यांनी ठराव मांडला आणि वयोमान केल्यानंतर पुन्हा ठराव दुसरा येईल आणि मग तुम्ही सांगा ह्याला बोलवा, त्याला बोलवा आपण काम ते सांगा अशी भाषा येथे चालत नाही.

**मा. सभापती :-**

ॲग्जेस्टमेंट झाले नाही म्हणुन विषय एवढा वाढला.

**मोहन पाटील :-**

काय ॲग्जेस्टमेंट झाले नाही आणि येथे ॲग्जेस्टमेंट चालत नाही, समजुतदारपणा चालतो. आलेल्या निविदामध्ये रेट जो ॲग्जेस्टमेंट आहे तो चालत नाही. आपण असे समजून घेऊ शकता. आपल्याला कमी येथे रेट मिळतो त्यात आपला फायदा होतो.

**धनराज अग्रवाल :-**

मी काय बोलतो.

**मोहन पाटील :-**

आपण आता काही बोलु नका हा विषय मंजुर झालेला आहे.

**मा. सभापती :-**

ठिक आहे.

**प्रकरण क्र. ४७**

महानगरपालिकेच्या बालवाड्यमधील विद्यार्थ्यांना एका वर्षासाठी सकस आहार पुरवठा करणे कामी आलेल्या दरपत्रकास मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ५६ :-**

सदरचा ठरावाची प्रत इतिवृत्तांता सोबत जोडून देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४८ चे वाचन केले.)

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, किती मिळकती जप्त केल्या आहेत ते आम्हाला ह्याच्यात कळत नाही.

**विजय पाटील :-**

सहाशे सत्ताहत्तर.

**धनराज अग्रवाल :-**

ते परत घ्यायला कोण येतच नाही का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

लिलाव ठेवला होता.

**याकुब कुरेशी :-**

एवढी मिळकत नगरपालिका परचेस करु शकते का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

नाममात्र एक रुपया आहे.

**मोहन पाटील :-**

साहेब, जर आमचा फ्लॅट असेल वैयक्तिक. मी एक नागरिक आहे आणि मी आर्थिक बोझामध्ये दबलेलो असेल आणि मला रक्कम भरता आली नाही. स्वराज्य संस्था आहे. तर सभापती साहेब असे आहे येथे असलेल्या नागरिकांना आपण वेळ दिला पाहिजे. नागरिकांना दाबवुन, नागरिकांना कायद्याचा बडगा दाखवुन जर आपण काम केले तर साहेब त्याचे परिणाम आम्हाला भोगायला लागतील. आपण ह्या ठिकाणी उपायुक्त आहात उद्या आयुक्त असाल त्याच्यानंतर महाराष्ट्र सचिव बनू शकाल आमची सदिच्छा आहे. पण आपण आम्हाला जगण्याची संधी द्या. कसे जगणार आम्ही जर सहाशे लोकांचे फ्लॅट जर आम्ही एक रुपयाने विकत घेऊन त्याचा लिलाव जर केला तर त्याच्यातले आमचे मतदार बंधु आहेत आणि आम्ही बॉडी म्हणुन आपणाला बोलतो. तुम्ही आम्हाला कायदा दाखवता आणि हा कायदा जर आम्ही केला तर उद्या आम्हाला येथे येण्याची आवश्यकता भासणार नाही. याच्यातुन तुम्ही काहीतरी मार्ग काढा. त्यांना आपण एकदा, दोनदा, तिनदा पनीशमेंट लावा. त्यांना तुम्ही करामध्ये पॅनल्टी आकारा आणि पॅनल्टी आकारायचा मार्ग तुम्ही शोधुन काढा. तुम्ही पुन्हा सांगाल की विषय येथे आणलेला आहे परंतु कृपया असा विषय आणु नका. तर ह्याच्यामध्ये आमची नालस्ती होऊ शकते आणि लोकप्रतिनिधी म्हणुन आम्हाला आमच्या नागरिकांचे हित ही बघितले पाहिजे आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेचे हित बघितले पाहिजे.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, सर्वसाधारण माणसाचे तुम्ही येथे आणले आहे. त्याच्यात लोकप्रतिनिधी, ऑफिसर ह्यांचे असतील तर त्यांचे ही आणा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मोहन पाटील साहेब, त्याच्या मताशी आम्ही सहमत आहोत. परंतु हे जे फ्लॅट आलेले आहेत आपल्या समोर हे फ्लॅट इन्व्हेस्टमेंट करुन अमेरिकेला, बंगलोरला, मुंबई आणि इतर वेगवेगळ्या ठिकाणी राहिलेले आहे. त्यांनाच त्यांची प्रॉपर्टी कुठे आहे ती माहिती नाही. बिल कुठे पाठवायचे हे समजत नाही म्हणुन आम्ही सोसायटीला किंवा त्या फ्लॅटवर चिकटुन येतो. दरवर्षी हा प्रोग्राम असतो. आपल्याला माहिती असेल, आपल्या माहितीसाठी सांगतो वर्षभर भिवंडी नगरपालिकेने वसुली करुन तीस टक्के झाली आणि उल्हास नगरने वर्षभर वसुली करुन सतरा टक्के झाली आम्ही तीन महिन्यात ८१ टक्के वसुली केली.

**मोहन पाटील :-**

तुमच्या वसुलीबाबत मा. महासभेने तुम्हाला धन्यवाद दिलेले आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मी वसुली जास्त केली हा सांगण्याचा उद्देश नाही आहे. मुद्दा सांगण्याचा असा आहे की, दरवर्षी हेच लोक रक्कम भरत नाही आणि ते कुठे आहेत ते ही सापडत नाही. जर त्यांच्यावर एकप्रकारे दहशत निर्माण नाही केली की, आम्ही तुमची रुम ताब्यात घेतो तर गावातल्या नागरिकांना जो वचक आहे, घ्यायचे की नाही घ्यायचे हा प्रश्न तुमचा आहे. म्हणजे काय निर्णय घ्यायचा हा प्रश्न आपला आहे. परंतु गैरसमज होऊ नये की, ते टॅक्स भरला नाही तर ते आपल्यावर कागदोपत्री कार्यवाही करतात, प्रत्यक्षात काही करत नाही असे होऊ नये.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सभापती या ठिकाणी प्रकरण क्र. ४८ मालमत्ता कराच्या वसुलीकामी अटकाव केलेल्या मिळकती जाहिर लिलावात विक्री करतांना उपलब्ध नसल्यास त्या मिळकती नाममात्र किमतीस महानगरपालिकेने खरेदी करणेबाबतचा विषय हा आज स्थायी समितीपुढे आलेला आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिकनियम १९४९ चे अनुसुचितील प्रकरण ८ मधील ४० अन्वये मागणी बिल आपण घेतो आणि त्यांनी मागणी बिल भरले नसेल तर त्यांना आपण मागणी नोटीस देतो. त्यानंतर वॉरंट देतो, नंतर पेपरला जाहिरात देतो, त्याच्यानंतर आपण जाहिर लिलाव लावतो.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

लिलाव करुन आले नाहीत म्हणुन तुमच्यापुढे नाममात्र एक रुपया किंमतीसाठी दिले आहे.

**आसिफ शेख :-**

लिलाव केलेला आहे का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

कोण आले नाहीत.

**आसिफ शेख :-**

लिलाव कधी ठेवला होता.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

लिलाव तेवीस तारखेला ठेवला होता.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, आपण जी बिल काढतो ते साधारण सुट्टीच्या वेळेत काढतो.

**आसिफ शेख :-**

नियम ४७(७) अन्वये नाममात्र किमतीस महानगरपालिका स्वतः ताब्यात घेऊ शकते. परंतु महापालिकेच्या स्थायी समितीच्या ह्याला परवानगी लागते.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

एखादा बिल तरी त्यावेळेला जाईल किंवा एखादी नोटीस तरी जाईल, वॉरंट तरी जाईल आणि ते कधी ना कधी सुट्टीमध्ये येतीलच.

**आसिफ शेख :-**

पुन्हा लिलाव लावा. आपल्या ह्या प्रस्तावाला बहुतांश सदस्यांचा विरोध राहील.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

साहेब, हा आपण घ्यायचा निर्णय आहे, आम्ही फक्त माहिती देत आहोत आपण ठराव केल्यानंतर.

**आसिफ शेख :-**

काही लोक बाहेरगावी गेले असतील, वसुली करण्याची जबाबदारी आपली आहे ना! एक रुपया नाममात्र तुम्ही घेणार.

**दिनेश नलावडे :-**

आसिफजी आपल्याला नाईक साहेब माहिती देत आहेत ती आपण ऐकुन घ्यावे व नंतर चर्चा करु.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आपण जर ठराव केला व ठराव केल्यानंतर आपण त्या मालकाला नोटीस काढतो की, तुमचा फ्लॅट नामामात्र एक रुपयाला घेतलेला आहे. तुम्ही सहा महिन्यात जर रक्कम भरली नाही तर तुमचा आम्ही ताबा घेऊ. त्यामुळे सभागृहाने निर्णय घ्यावा.

**अशोक पाटील :-**

ह्या जप्त केलेल्या मालमत्ता आहेत तर किती वर्ष झाले त्यांनी टॅक्स भरलेले नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मालकच जर तिथे नसेल तर नोटीस कशी मिळेल?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

तेच अवघड व्हायला लागले आहे. त्यांचा पत्ता देखील सोसायटीवाले देत नाही.

**आसिफ शेख :-**

मागणी बिल दिल्यानंतर आपण संबंधित फ्लॅटधारकाची सही घेतो किंवा सोसायटीवाल्यांना दिल्यावर सोसायटीची सही घेतो. ह्याच्यामध्ये आपल्याला सोसायटीने काय काय कळविले आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

सोसायटीला पत्ता नाही त्यांचे पण मेनटेनन्स चार्जेस बाकी आहे.

**आसिफ शेख :-**

नंतर काय होईल, असे होईल तुम्हीच तर ठराव केला एक रुपया घ्यायला, तुम्ही सदस्यांना विचारा मग ते नागरिक आमच्या विरोधात जातील.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

विरोधात ते नागरिक जाणार नाही कारण ते तुमचे नागरिक नाही व मतदार यादीतही त्यांचे नाव नाही.

**मिलन म्हात्रे :-**

नाईक साहेब प्रकरण ४८ वर आपण जी कार्यवाही केलेली आहे. ती एका हिशोबाने योग्य आहे. कारण आम्ही सर्व नगरसेवक डिफॉल्टर नसलो तरच निवडुन येतो व आम्ही आमचे कर्तव्य करत असतो. काही कोणाला घाबरायची गरज नाही. आपण एकीकडे बजेटच्या सभेला बसल्यानंतर अधिकाऱ्यांवर ओढुन तोडुन ह्या बजेटमध्ये अशी तरतुद करा व ह्याचे पैसे कुठुन आणायचे हेच विचारले जातात. आपण हे सगळे करत असताना जसे नाईक साहेबांनी म्हटले की, शहरात जे नॉन रेसीडेनशियल इंडियन आहेत, फक्त फायनानसर म्हणुन जे येथे आहेत किंवा ज्यांनी आपले पैसे लावुन दहा लाखाचा फ्लॅट घेतो आणि तो वीस लाखाला विकतो त्यावेळेला मी तुम्हाला कसलीही माहिती देत नाही. तुम्ही आमच्या इमारतीपर्यंत पाण्याचे कनेक्शन लावले व आज ह्या फ्लॅटचा रेट दोन लाखांनी वाढला हे कोणच बोलत नाही. हे तो बिल्डरही बोलत नाही आणि फ्लॅटवाला देखील बोलत नाही. त्याकरीता ह्या विषयाचे बाऊ करणे हे नियमाच्या हे नियमाच्या बाह्य आहे असे मला वाटते. कारण साहेबांनी जी टिपणी दिलेली आहे. त्याच्यामध्ये संपुर्ण असे डिटेल दिलेले आहे. त्यांना ज्या काही संधी द्यायच्या आहेत त्या आपण वर्ष, दीडवर्ष दिलेले आहे. त्यामुळे आपण त्यांच्यावर अन्याय करतोय अशातला भाग नाही. एक रुपयाच्या जप्तीनंतर ते परत सहा महिन्याचा अवधी देत आहेत. असे नाही की, ते लगेच जप्त केले आणि जमा झाल्या.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

ते सर्व नियमातच आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ते मी सर्व वाचले आहे. तुम्ही जर दहशत दाखविली नाहीतर तर ते होणारच नाही. नाईक साहेबांनी काय केलेच नसते जर पाण्याचे कनेक्शन कापली नसती तर वसुली झालीच नसती.

**आसिफ शेख :-**

प्रेमाची दहशत दाखवा.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्याला किती लिगल, किती इललिगल हे कळलेच नसते. त्याकरीता हा ठराव आपण मंजुर करावा आणि कुठेतरी एक शिस्तबद्धता यावी.

**आसिफ शेख :-**

राज्यातील नगरपालिका, महानगरपालिका आहेत तिथे झाला आहे का अशा प्रकारचा प्रकार?

**मिलन म्हात्रे :-**

माझ्या वॉर्डमध्ये असे पन्नास फ्लॅट आहेत की ते बिल्डिर लोकांचे आहेत. त्याचे काहीच देणघेणं नाही आहे.

**दिनेश नलावडे :-**

सभापती महोदय प्रकरण क्र. ४८ आहे. त्याला सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेजी यांनी ठराव मांडलेला आहे. मी त्या ठरावास अनुमोदन देत आहे.

**प्रकरण क्र. ४८ :-**

मालमत्ता कराच्या वसुलीकामी अटकावुन ठेवलेल्या (जप्त) मिळकती जाहीर लिलावात विक्री करताना खरेदीवर उपलब्ध नसल्यास त्या मिळकती नाममात्र किंमतीस महानगरपालिकेने खरेदी करणेबाबत.

**ठराव क्र. ५७ :-**

महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या साधनापैकी ''मालमत्ता कर'' हे एक प्रमुख साधन आहे व अशा प्रकारे प्राप्त झालेल्या उत्पन्नातून शहराच्या विकास कामास चालना मिळते.

मालमत्ता कर वसुली कामी प्रथम ''मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९'' चे अनुसूचीतील प्रकरण ८ मधील ''नियम-४०'' अन्वये ''मागणी बिल'' बजावण्यात येते. बिल बजावल्यानंतर अनुज्ञेय असलेल्या १५ दिवसांच्या मुदतीत कराचा भरणा केला नाही तर ''नियम-४१'' अन्वये थकबाकीदारांवर ''मागणी नोटीस'' बजावली जाते. या उपर ही १५ दिवसांत करांचा भ्रणा न केल्यास ''नियम-४२'' प्रमाणे ''अधिपत्र'' बजावून सदर मालमत्ता अटकावली (जप्त) जाते. मात्र ''नियम-४५'' अन्वये अटकावलेल्या मिळकतधारकांनी वसुलीच्या खर्चासहित थकित रक्कम ५ (पाच) दिवसांत महानगरपालिकेकडे भरण्यात आली नाही तर अटकावलेल्या (जप्त केलेल्या) मिळकती जाहीर लिलावाद्वारे विकण्यांत येतील असे महानगरपालिकेने जाहीर करावे लागते. या उपरही कराचा भरणा न केलेल्या मिळकती ''नियम-४६'' अन्वये अटकावलेल्या मिळकतींची सुची तयार करुन त्या मिळकती

जाहीर लिलावाद्वारे विक्रीची नोटीस दिली जाते. अशा प्रकारे नोटीस दिल्यानंतर महानगरपालिका ठरवते त्या ठिकाणी ''नियम-४७'' अन्वये अटकावलेल्या मिळकती प्रत्यक्ष लिलावाद्वारे विक्री करण्यांत येतील. याप्रमाणे सन २००३-२००४ या आर्थिक वर्षात दैनिक मुंबई सकाळ, नवशक्ती, लोकमत वृत्तपत्रात ६७७ थकबाकीदांची जाहिरात देऊन, मुख्य कार्यालय, तिसरा माळा, भाईंदर (पश्चिम) येथे थकबाकीदारांच्या मालमत्तेचा लिलाव ठेवण्यांत आलेला होता. परंतु या लिलावात कोणीही इच्छुक खरेदीदार उपलब्ध झालेला नव्हता.

महानगरपालिकेने कर वसुली कामी अटकावलेल्या मिळकती जाहीर लिलावाद्वारे विक्री करतांना कोणताही इच्छुक खरेदीदार उपलब्ध न झाल्यास अशा सर्व मिळकती ''नियम-४७(७)'' अन्वये नाममात्र किंमतीत महानगरपालिका स्वतः ताब्यात घेऊ शकते. त्याप्रमाणे सन २००३-२००४ या वर्षामध्ये जाहीर लिलावाद्वारे विक्रीची नोटीस देऊनही कोणीही इच्छुक खरेदीदार उपलब्ध न झाल्याने वरील नियमाद्वारे ज्या सदनिका धारकांची थकबाकी आहे. त्यांच्या सदनिका/शॉप रुपये १/- नाममात्र किंमतीत महानगरपालिकेने ताब्यात घेण्यांत ही सभा मंजुरी देत आहे. तसेच पुढील येणाऱ्या सर्व आर्थिक वर्षात वरीलप्रमाणे कार्यवाही पुर्ण करुन मालमत्ता कर वसुली कामी अटकावण्यात येणाऱ्या मिळकती जाहीर लिलावाद्वारे विक्री करतांना इच्छुक खरेदीदार उपलब्ध न झाल्यास अशा सर्व मिळकती महानगरपालिकेने नाममात्र रुपये १/- इतक्या किंमतीत ताब्यात घेण्यासही स्थायी समितीची मंजुरी घेण्यांत येत आहे.

परंतु महानगरपालिकेने नाममात्र रुपये १/- इतक्या किंमतीत ताब्यात घेतलेल्या मालमत्ता थकबाकीदारांना ''नियम-४७(३)'' प्रमाणे नोटीस देऊन सहा महिन्यापर्यंत मुदत देण्यांत यावी.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४९ चे वाचन केले.)

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, ह्या विषयाची टिपणी आता सदस्यांसमोर आलेली आहे. ते आम्ही वाचणार कधी आणि त्याच्यावर अभ्यास करणार कधी? तेव्हा कृपया हा विषय आपण पुढच्या सभेत घ्यावा.

**याकुब कुरेशी :-**

मागच्या सभेत देखील बोललो होतो की, आपण ह्या टिपण्या सभागृहामध्ये देतात ती चुकीची पद्धत आहे. तुम्ही बाकीच्या टिपण्या पाठवतात त्यावेळी आपण ही टिपणी का पाठवली नाही.

**प्र. सचिव :-**

मला आजच गोषवारा मिळाला.

**याकुब कुरेशी :-**

मग ते पुढच्या सभेत विषय घ्यायचा होता. आठ दिवसानंतर काय फरक पडणार.

**अशोक पाटील :-**

संबंधित विभागाला तशी नोटीस द्या आणि पुन्हा असे विषय विषयपत्रिकेवर घेऊ नका.

**हॅरल बोर्जिस :-**

विषय पत्रिकेवर विषय घेताना गोषवारा नसेल तर विषयच घेऊ नका. नेहमी नेहमी असेच होते.

**मा. सभापती :-**

मी सांगितले होते, त्या लोकांना लवकर ठेवायला आणि कालपर्यंत मनाले साहेब गोषवारा घेऊन कमीशनर साहेबांकडुन सर्व रेट लिहुन घेऊन आले म्हणुन उशिर झाला.

**प्रकरण क्र. ४९**

मुंबई प्रांतिक अधिकनियम १९४९ चे कलम ३७४ व ३८६ नुसार विविध व्यवसायांना परवाना देण्यासाठी दर निश्चित करणेबाबत.

**ठराव क्र. ५८ :-**

मा. सभापती सो. यांच्या आदेशानुसार सदरचा विषय तहकुब करण्यांत आला.

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ५० चे वाचन केले.)

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, ह्याच्यामध्ये १२४ नंबर आहे. उत्तन येथे भातोडी बंदर ब्रिजच्या बाजुला सी.सी. हॉल बांधुन माती भराव करणे. हे विकासाचे काम नसुन विनाशाचे काम आहे. ते काम ह्याच्यातुन रद्द करावे.

**मा. सभापती :-**

खांबीत, ह्याच्यातुन ह्यांनी सुचवलेले हे काम रद्द करावे.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, या कामाच्या यादीमध्ये बरीच कामे अशी आहेत.

**याकुब कुरेशी :-**

सन्मा. सदस्यांनी ज्या कामाबाबत ऑब्जेक्शन घेतले आहे त्याचा पहिल्यांदा खुलासा करावा. मग ते काम रद्द करावे. नक्की अडचण काय आहे ते सभागृहाला कळु द्या.

**हॅरल बोर्जिस :-**

तुम्ही त्या कामाचे जे एस्टीमेट बनवले व ते स्थायी समिती समोर सादर केले.

**याकुब कुरेशी :-**

विनाकारण कामाचा आपण आम्हाला गोषवारा देता. सदस्यांच म्हणण्याप्रमाणे विनाशकारी काम आहे आणि असे काम तुम्ही करता. हा प्रकार काय आहे?

**मा. सभापती :-**

मला घोन्सालवीसजी बोलले तर मग मी बोललो आपण ते काम कॅन्सल करु.

**दिपक खांबित :-**

साहेब, माहिती घेऊन सांगतो. इंजिनिअर येत आहेत. त्यांच्याकडुन आपण डिसीजन घेऊ.

**जोजफ घोन्सालवीस :-**

खाडीलाच तुम्ही ते बांधणार का?

**दिपक खांबित :-**

साहेब, तिकडे तिथल्या नगरसेवकांनी शिफारस केली आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

नाही. तिथल्या नगरसेवकांनी शिफारस केलेली नाही. आमच्या वार्डातल्या नगरसेवकांनी शिफारस केली नाही. ते दुसरे कोणी केली असेल त्यामुळे त्याला नाल्याची माहिती नाही.

**दिपक खांबित :-**

आपणांस याबाबत माहिती देतो.

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब, आयटम नंबर ७६ भाईंदर पश्चिम सर्वे क्र. २७६ ते २३८ पर्यंत डी.पी. रोड तयार करणे हे नुसते बांधकाम पर्यंत राहत नाही. तर आपण काय करायचे आहे.

**मा. सभापती :-**

हे घ्यायचे की नाही घ्यायचे.

**दिपक खांबित :-**

मा. महासभेपुढे विषय ठेवला होता त्यानंतर ठराव असा झाला की ज्यांचे जे प्रस्ताव असतील ते आयुक्त साहेबांकडे देवुन या सभेमध्ये घ्यायचे त्यानंतर स्थायी समितीमध्ये प्रायोरीटी ठरवायची त्यानंतर हा प्रस्ताव नगरसेवकांकडुन आला होता.

**अशोक पाटील :-**

तिथे कोण राहत नाही तिथे बांधकाम नाही. डी.पी. रोड आहे तिथे प्रयोजन काय?

**दिपक खांबित :-**

तिथल्या नगरसेवकांनी सुचवले आहे.

**शरद पाटील :-**

ह्याच्यात बरेचसे रस्ते असे आहेत की, जिथे भरणी झालेली आहे आणि आपण ते ह्याच्यात घेतलेले आहे ते बनवायचे म्हणुन मग ती भरणी कशी झाली? मग आता आम्हाला त्याचा अभ्यास करायला लागेल. कम्पलिट सर्व्हे करायला लागेल.

**धनराज अग्रवाल :-**

आपण सर्वेअर नेमला आहे. त्या सर्वेअरला सांगा कुठले रस्त् डी.पी. रोडमध्ये जास्त झालेले आहेत, कुठले बिल्डरचे आले नाही, कुठे जमीन दिलेले आहे त्याचा तुम्ही सर्वे करुन द्या. जर आपल्याला त्यांनी रस्ता दिला नसेल आणि त्याचे काम चालु असेल तर आपण तो रस्ता कसा बनवायचा?

**दिपक खांबित :-**

मा. महासभेपुढे १२७ कामे दिली होती. ती सर्व तपासुन सर्व सदस्यांची कामे घ्यायची आहे असे ठरले त्याप्रमाणे आम्ही ती सर्व कामे घेतलेली आहेत, सदस्यांच्या सुचनेनुसार.

**शरद पाटील :-**

सभापती साहेब, ११५ चे काम आहे भाईंदर पश्चिम साईबाबा उद्यानामध्ये लॅन्डस्केपींग करणे दोन लाख रुपये. आताच मध्ये आपण त्याला दोन लाख रुपये दिले, पहिले दहा लाख रुपये दिले होते. केवढे मोठे गार्डन आहे. तेच मला समजत नाही आणि त्याच्यात किती पैसे टाकायचे आणि त्याच्यात किती पैसे टाकले त्याची आपण आम्हाला पहिले माहिती द्या. आज एवढी कामे घेतली गेली आणि आमच्या कॅबिन येथे सहा वर्षे झाली पण त्या कॅबिन रोडचे ह्याच्यात कामच नाही.

**धनराज अग्रवाल :-**

ह्याच्यात दुसऱ्या गार्डनचा विषय आणा. परत परत त्याच गार्डनच कसे येते.

**दिपक खांबित :-**

ते चांगले आहे.

**शरद पाटील :-**

कसले चांगले आहे, ह्यावर्षी त्याचे पॅचवर्कचे काम देखील झाले नाही. गेल्या वर्षाचे पॅचवर्कमध्ये सात करोड रुपये होते पॅचवर्क होते आणि आता नवीन पाहिजे कारण त्याला सहा वर्ष झाले. ते उखडुन नवीन कामामध्ये आपण घ्या आणि ते गेल्या वर्षीच्या पॅचवर्कमध्ये पॅचवर्क झाले नाही.

**दिपक खांबित :-**

आम्हाला दोनशे कोटीमध्ये सगळी कामे करायची होती.

**दिनेश नलावडे :-**

शरद पाटील ह्यांनी जी सुचना केलेली आहे तर आपण प्रत्यक्षात जाऊन पाहणी करु.

**शरद पाटील :-**

गेल्यावर्षी सात करोड रुपये पॅचवर्कला होते आणि कॅबिन रोड येथे पॅचवर्क झाला नाही, सांगितले गेलेले दोन स्पीड ब्रेकर बसले गेले नाही, तिथे सरस्वती विद्यालयाचे मुले आहेत.

**दिपक खांबित :-**

स्पीड ब्रेकर बसवले गेले नाही पण पॅचवर्क झाले आहे.

**शरद पाटील :-**

पॅचवर्क झाले आहे असे आपण आम्हाला दाखवा. आपण आता सभापती महोदयांच्या जोडीला जाऊ या.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, कुठल्या कुठल्या प्रभागात पाच लाखाचे काम आले नाही तर कुठल्या प्रभागात पाच करोडचे काम आले आहे असे झाले आहेत. भेदभाव झालेला आहे.

**दिनेश नलावडे :-**

सन्मा. सदस्य धनराजजी अग्रवाल आपण ह्या सभागृहामध्ये अतिशय ज्येष्ठ सदस्य आहात. तर काही प्रभागात काम आहे, काही प्रभागात कामे निघाली आहेत, तर काहीकडे काम झालेले आहे. तुम्ही आज जो विषय घेतला की, कुठेतरी भेदभाव होतोय तर भेदभाव हा शब्द साहेब आपल्या तोंडी बरोबर वाटत नाही. प्रभाग नं. ८ हा अतिशय कामाचा आहे आणि तिथे जर आपण फिरलात तर आपल्याला कामाची भावना माहित पडेल. भेदभाव हा विषय काढता हा विषय कृपया बरोबर नाही.

**धनराज अग्रवाल :-**

त्यांच्या प्रभागात काम झालेले आहे तरी ते काम परत आलेले आहे मग ते भेदभाव नाही का?

**दिनेश नलावडे :-**

पाहणी करुन आपल्याला इंजिनिअर साहेब खुलासा देतील.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, जो रेल्वे फ्लाय ओव्हरवरुन जो समांतर रस्ता झालेला आहे. तो रस्ता उत्तन रोडला वळतो आणि तिथे झोपडपट्ट्या झालेल्या आहेत. रस्ता चांगला सुंदर बनवायला घेतलेला आहे. त्यामध्ये प्रशासनाचे अभिनंदन आणि तो रस्ता आता पुर्णत्वाच्या मार्गावर आहे. आज त्या रस्त्याच्या बाजुला गार्डन रिझर्व्हेशन आहे तो गार्डन जर आपण सुशोभित केला तर बरेचसे लोक संध्याकाळी, सकाळी वॉकवर जातात आणि तो शहराचा एकदम चांगला भाग आहे. जर आपण त्या गार्डन रिझर्व्हेशन प्रायोरिटीने डेव्हलप करायला ह्याच्यामध्ये घेतले तर बरे होईल.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, ह्याच्यात जे कॅबिन रोडचे सांगितले ते त्याच्यात ॲड करुन घ्या.

**दिनेश नलावडे :-**

सन्मा. सदस्य शरद पाटीलजी ह्यांनी जी आपल्याला सुचना केली कॅबीन रोडबद्दल तर आपण पाहणी करुन तसे करुन घ्यावे.

**याकुब कुरेशी :-**

सभापती महोदय, सन्मा. सदस्य अशोक पाटील ह्यांनी जो सुझाव मांडलेला आहे तो लक्षात घेऊन त्याचा ही समावेश ह्यात करावा. कारण तिथे अतिक्रमण मोठ्या प्रमाणात होत आहे आणि जी उरलेली जागा आहे ती अतिक्रमणात जाऊ नये म्हणुन आत्ताच त्याचा विचार करावा.

**धनराज अग्रवाल :-**

मोदी पटेल रोड आणि महाराणा प्रताप रोड अजुन नवीन झालेले नाही.

**दिनेश नलावडे :-**

ह्या ठिकाणी शरदजी पाटील आणि धनराजजी अग्रवाल साहेब ह्यांचे विषय संपले की नंतर आपण बोलावे.

**शरद पाटील :-**

